महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

MCT वार्ता DIGITAL

प्रकाशन: मुंबई सह एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Maharashtracrimetimes.com | MHCrimeTimes | MAHCrimeTimes | 9803386748 | maharashtracrimetimes@gmail.com

मूल्य २/- रुपये

• संपादक: राकेश शंकर गोरे | वर्ष: १५, अंक: ४५, पृष्ठ: ८ | मुंबई, मंगळवार ४ फेब्रुवारी २०२५ ते सोमवार १० फेब्रुवारी २०२५ • POSTAL REG.NO. MCN/157/2023-2025 • RNI. REG. NO. MAHMAR/2010/33301

## संक्षिप्त

### पुण्यात GBS चा उद्रेक सुरुच, रुग्णांचा आकडा झपाट्याने वाढला

■ पुणे : अभिजीत येरल्लू

मागील काही दिवसांपासून पुण्यात Guillain Barre Syndrome अर्थात जीबीएसचा संसर्ग वेगानं पसरताना दिसत आहे. पुण्यासह आसपाच्या गावात जीबीएसचे रुग्ण वाढत असू शहरात GBS चा विळखा घट्ट होताना दिसत आहे. GBS च्या वाढत्या रुग्णांमुळे पुणेकरांची चिंता वाढली आहे. पुण्यात GBS चा उद्रेक सुरूच असून रविवारी नव्याने उंएचे



तीन नवीन रुग्ण आढळले आहेत. यामुळे आता पुणे करांची चिंता वाढली आहे. सध्या पुण्यात जीबीएसची रुग्णसंख्या १५८ वर गेली आहे. रविवारी पुण्यात तीन नवीन रुग्ण आढळून आले. १५८ पैकी २१ रुग्ण सध्या व्हेंटिलेटरवर असून पुण्यातील वेगवेगळया रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दुषित पाण्यामुळे रुग्णसंख्या वाढत असल्याची शंका महापालिका प्रशासनाला आहे. या आजाराचं मूळ शोधण्याचा प्रयत्न प्रसाशनाकडून केला जात आहे. यासाठी सिंहगड परिसरातील पाण्याचे नमुने फॉरेन्सिक टेस्टिंगसाठी पाठवण्यात आले आहेत. पण अजूनही रुग्ण वाढीचं कारण सापडू शकलं नाही.

### जम्मू-काश्मीरच्या कुलगाममध्ये २ दहशतवादी ठार; सुरक्षा दलाची कारवाई

■ श्रीनगर : वृत्तसंस्था

जम्मू काश्मीरमधील कुलगाम जिल्ह्यात दोन दहशतवाद्यांना कंठस्नान घालण्यात सुरक्षा दलांना यश आले आहे. सुरक्षा दलांनी एन्काऊंटरमध्ये ठार केलेले दोन्ही दहशतवादी हिजबुल मुजाहिद्दीनचे असल्याची माहिती समोर आली आहे. कुलगामच्या खुडवानी परिसरात दहशतवादी लपून बसल्याची माहिती रविवारी रात्री सुरक्षा दलांना मिळाली होती. यानंतर या भागात सर्च ऑपरेशन सुरु करण्यात आले. सर्च ऑपरेशन सुरु असताना दहशतवाद्यांनी सुरक्षा दलाच्या



जवानांच्या दिशेने गोळीबार केला. या गोळीबाराला सुरक्षा दलाच्या जवानांनी चोख प्रत्युत्तर दिले. सुरक्षा दलाच्या जवानांकडून करण्यात आलेल्या गोळीबारात हिजबुल मुजाहिद्दीनचे दोन दहशतवादी ठार झाले. तर तिसऱ्या दहशवाद्याला पकडण्यात सुरक्षा दलाच्या जवानांना यश आले. कुलगाममध्ये काही दहशतवादी लपून बसल्याची माहिती सुरक्षा दलांना काल (रविवारी) मिळाली होती. या दहशतवाद्यांचा शोध सुरु असताना त्यांच्याकडून सुरक्षा दलांच्या दिशेने गोळीबार करण्यात आला.



# अर्थसंकल्प केवळ 'लोकांनी, लोकांसाठी, लोकांचे...'-सीतारामन

## मोदी यांच्या आग्रहामुळेच करकपात केल्याची माहिती

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

**लोकांकडून, लोकांसाठी, लोकांचा अर्थसंकल्प असे वर्णन करत मध्यमवर्गीयांना मोठा दिलासा दिला, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी रविवारी दिलेल्या मुलाखतीत सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे मध्यमवर्गासाठी करकपात करण्याच्या बाजूने आधीपासूनच आग्रही होते. मात्र कर अधिकाऱ्यांना करकपातीची गरज समजून देण्यासाठी वेळ लागला, असे सीतारामन म्हणाल्या.**

देशात प्रामाणिक करदाते असून, त्यांच्या आकांक्षा पूर्ण होत नसल्याबद्दल तक्रार करणाऱ्या मध्यमवर्गीयांचा आवाज आम्ही ऐकला आहे. करदात्यांसह मध्यमवर्गीयांवरील महागाईसारख्या घटकांचा परिणाम मर्यादित करण्यासाठी सरकारने अधिक प्रयत्न करावेत अशी इच्छा असल्याने, पंतप्रधानांनी दिलासा देण्याचे मार्ग शोधण्याचे काम तातडीने केले, असे सीतारामन यांनी सांगितले. पंतप्रधान मोदी यांनी कर सवलतीसाठी तत्परतेने सहमती दर्शवली असली तरी, कल्याणकारी आणि इतर योजनांसाठी महसूल संकलन सुनिश्चित करण्याचे काम असलेल्या अर्थ मंत्रालयातील अधिकाऱ्यांना आणि केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाला (सीबीडीटी) पटवून देण्यासाठी थोडा वेळ लागला, असे त्यांनी आवर्जून सांगितले. शनिवारी सलग आठवा अर्थसंकल्प सादर करताना, सीतारामन यांनी मध्यमवर्गाचा भारतीय अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा असल्याचे सांगून या अर्थसंकल्पात मध्यमवर्गासाठी करात भरघोस सवलत सुचविली. पगारदारांना भरघोस म्हणजे पावणेतेरा लाखांइतके वार्षिक उत्पन्न करमुक्त होणार असल्याची घोषणा केली. कररचनेत बदल करताना फक्त नवीन करप्रणालीनुसार कर भरणाऱ्या करदात्यांसाठीच करमुक्त उत्पन्नाची मर्यादा ७ लाख रुपयांवरून थेट १२ लाख रुपयांपर्यंत वाढवली. करमुक्त उत्पन्नाच्या मर्यादेत थेट ५ लाख रुपयांची वाढ ही आतापर्यंतची सर्वात मोठी वाढ आहे. हा लोकांचा लोकांना हवा असलेला अर्थसंकल्प आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## ...अन्यथा भारतात AI क्रांती अशक्य? राहुल गांधींनी संसदेत मांडला मुद्दा

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात सध्या AI अर्थात आर्टिफिसीअल इंटेलिजन्सचा बोलबाला आहे. तंत्रज्ञानच नाही तर शेतीपासून सर्वचं क्षेत्रात याचा वापर होणार आहे. हा जगासाठी नवा अविष्कार आहे. AI मॉडेल विकसित करणं सोपं झालं. मात्र आपल्याकडे डेटाच नाही ज्याच्यावर एआय काम करत. मग भारतात एआय क्रांती कशी शक्य आहे, असा मुद्दा राहुल गांधी यांनी उपस्थित केला आहे. राहुल गांधी म्हणाले की, चीन उत्पादनात भारतापेक्षा



दरम्यान चीनी DeepSeek च्या अविष्काराने अमेरिकेसह या क्षेत्रात काम करणाऱ्या कंपन्यांना मोठा धक्का बसला आहे. भारतही स्वत: चं एआय मॉडेल विकसित करण्याच्या प्रयत्नात आहे. अर्थसंकल्पातही AI साठी तरतूद करण्यात आली आहे. त्यावर राहुल गांधी यांनी महत्त्वाचा मुद्दा उपस्थित केला आहे. अमेरिका आणि चीनकडे स्वत: डेटा आहे. त्यामुळे त्यांनी कितीतरी पुढे आहे. आहे तर भारत वापरात पुढे आहे. आपण सध्या एआय बद्दल बोलत आहोत. मी देशातील तरुणांना सांगू इच्छितो की एआय डेटावर चालतं हे समजून घेण्याची गरज आहे. डेटाशिवाय एआयचा काहीही उपयोगन नाही ते अस्तित्वातच येणार नाही. एक गोष्ट स्पष्ट होते की डेटा, मग तो फोनचा असो, (शेष पृष्ठ २ वर)

## स्वतःची चूक झाकण्यासाठी डीवचू नका, जरांगेंचा नामदेव शास्त्रीवर निशाणा म्हणाले, 'जातीयवादाचा नवा अंक..'

■ मुंबई : सम्यक कासारे

सरपंच संतोष देशमुख प्रकरणात भगवानगडचे महंत नामदेव शास्त्री यांनी उडी घेतल्याने राजकीय वातावरण तापले आहे. मनामध्ये धनंजय मुंडे खंडणी प्रकरणातील गुन्हेगार नाहीत हे १००% खात्रीने सांगतो असं वक्तव्य केल्यानंतर आज धनंजय देशमुख महंत नामदेव शास्त्रींची भेट घेणार आहेत.दरम्यान, मराठा आरक्षण स्थगित केल्यानंतर मनोज जरांगे यांनी नामदेवशास्त्रींवर हल्लाबोल केलाय. स्वतःची चूक झाकण्यासाठी डीवचू नका, तुमच्याकडून



चूक झाली आहे.एका समाजाला बाजूला नेण्याचं काम झालं आहे ,असं मनोज जरांगे म्हणाले. ज्यांच्याकडे मानाचा तुरा आहे तिथेही जातीयवाद होऊ शकतो.जातिवादाचा नवा अंक ते देऊन गेले आहेत असं जरांगे म्हणाले. महंत नामदेव शास्त्रींच्या वादग्रस्त वक्तव्यानंतर आज धनंजय देशमुख कुटुंबीयांसह भगवानगडावर जाणार आहे.यावर मनोज जरांगे म्हणाले,हा त्यांचा वैयक्तिक प्रश्न आहे. कुटुंबांनं जावं. महाराजांना जे बोलायचं होतं ते बोलून गेले.जातीयवादाचा नवीन अंक देऊन गेले.नामदेव शास्त्री आरोपींचा समर्थन करत आहे.संतोष देशमुख यांची हत्या केली म्हणून आरोपींना आनंद वाटला असेल.ज्यांच्याकडे मानाचा तुरा आहे तिथेही जातीयवाद होऊ शकतो. याचा नवीन अंक पाहायला मिळत आहे असं मनोज जरंगे म्हणाले. आम्ही तुमचा सन्मान करतो पण आपण आपलं बघावं दुसऱ्याकडे डोकावून पाहू नका.स्वतःची चूक झाकण्यासाठी डीवचू नका. तुमच्याकडून चूक झाली आहे.एका समाजाला एका बाजूला नेण्याचं काम झालं आहे.जातीय सलोखा बिघडवायला नको होता.

## एकनाथ शिंदेंनी सामना आणि संजय राऊतांविरोधात कोर्टात गेलं पाहिजे, त्यांना एकाकी पाडायचा प्रयत्न; शिवसेना नेत्याचा गंभीर आरोप

■ मुंबई : नितीन देवळेकर

महायुतीमध्ये कोणताही वाद नाही, त्यांना लोकांमध्ये एकनाथ शिंदे यांची प्रतिमा मलिन करायची आहे. माझं तर मत आहे एकनाथ शिंदे यांनी सामना विरोधात आणि संजय राऊत विरोधात कोर्टात गेलं पाहिजे, सातत्याने माझी बदनामी करता येत म्हणून न्यायालयात दाद मागितली पाहिजे, असा सल्ला ज्येष्ठ शिवसेना नेते रामदास कदम यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. भाजप शिवसेनेमध्ये मिठाचा खडा टाकायचा आहे, शिंदेंना एकाकी पाडायचं आहे. संजय राऊत यांच्या वक्तव्याला कोणी विश्वास ठेवत नाही, अशी टीका त्यांनी केली. रामदास कदम म्हणाले की, आमच्या माहितीप्रमाणे देवेंद्र फडणवीस



वर्षा बंगल्यावर राहण्यासाठी येणार नाहीत. त्यांचे तिथं दोन बंगले आहेत. वर्षा बंगल्यावर कार्यालय करतील अशी माझी माहिती आहे, पण जणू काही आपणास शिंदे यानी काळी जादू झाली आहे अशा बातम्या संजय राऊत पसरवत आहेत. शिंदे यांच्या भाषणात जाहीरपणे म्हणाले होते की, वर्षा बंगला सन्माननीय आदरणीय उद्धव ठाकरे यांनी सोडला त्यावेळी टोपलीवर लिंबू मिळाले. म्हणून काळ्या जादूचे बादशाह हे तुमचे उद्धव ठाकरेच आहेत, अशी टीका रामदास कदम यांनी केली. कदम यांनी सांगितले की, संजय शिरसाट यांनी दोन्ही शिवसेना एकत्र येण्यावरून मत व्यक्त केले ते त्यांचं वैयक्तिक मत आहे. (शेष पृष्ठ २ वर)

## 'लाथ काय अशा पंचांना गोळ्या घालत्या पाहिजेत...', डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटलांचा शिवराज राक्षेला पाठिंबा

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

अहिल्यानगर येथे २ फेब्रुवारीला प्रतिष्ठित महाराष्ट्र केसरी २०२५ चा उपांत्य फेरी आणि अंतिम फेरीचा सामना खेळवण्यात आला होता. या स्पर्धेत पुण्याचा पैलवान पृथ्वीराज मोहोळने बाजी मारत मानाची गदा पटकावली. पण अंतिम फेरीदरम्यान त्याचा प्रतिस्पर्धी पैलवान महेंद्र गायकवाड याने पंचांच्या निर्णयाविरोधात मैदान सोडल्याने त्याला विजयी घोषित करण्यात आले. पण तत्पूर्वी शिवराज राक्षेने देखील उपांत्य फेरीच्या सामन्यात पंचांच्या निर्णयाविरूद्ध मोठा वाद घातला. पृथ्वीराज मोहोळ आणि शिवराज राक्षे



यांच्यातील उपांत्य फेरीचा निकाल पंचांनी अवघ्या ४० सेकंदात दिला होता. पण शिवराजने खांदे जमिनीला टेकले नसल्याचे सांगत पंचांकडे रिव्ह्यूची मागणी केली. पण पंचांनी त्याच्या या मागणीकडे दुर्लक्ष केलं. शिवराजसह त्याचे प्रशिक्षक आणि त्याच्या समर्थकांनीही त्याचे खांदे खाली टेकले नव्हते त्यामुळे रिव्ह्यू पाहून निर्णय द्यावा असे सांगितले. शिवराजने पंचांनी विनंती देखील केली, पण पंचांनी काही प्रतिसाद दिला नाही. यानंतर संतापलेल्या शिवराजने पंचांची कॉलर धरली आणि त्यांनी लाथदेखील घातली, ज्याचा व्हीडिओ व्हायरल झाला. पंचांबरोबर गैरवर्तन केल्याप्रकरणी कुस्तीगीर परिषदेने शिवराज राक्षेवर तीन वर्षांची निलंबनाची कारवाई केली आहे. यानंतर आता डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. पैलवान चंद्रहार पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधताना सांगितलं, 'खरंतर काल जे घडलं ते चुकीचं झालं. खरंतर शिवराजच्या बाबतीत जे घडलं त्यामध्ये पृथ्वीराजची चूक नाही आणि शिवराजची देखील चूक नाही. तिथे चूक फक्त त्या मॅटवर असणाऱ्या पंचांची चूक आहे.'

## मराठीचा अनादर करणाऱ्यांची दादागिरी ठेचून काढू; मंत्री उदय सामंत यांचा इशारा

■ पुणे : अकिल शेख

महाराष्ट्रात मराठीचा अनादर करणाऱ्यांची दादागिरी ठेचून काढू, असा इशारा मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिला. येत्या पंधरवड्यात माझ्या विभागाअंतर्गत राज्यातील सर्व पोलीस अधीक्षकांची बैठक बोलावून त्यांना या संदर्भात सूचना करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. भाषेच्या संवर्धनासाठी मराठी माणसावर होणाऱ्या अन्यायासंदर्भात राज ठाकरे आणि त्यांचा पक्ष करत असलेले काम कौतुकास्पद आहे. शासन म्हणून आम्ही त्यांच्या भूमिकेसोबत राहू, अशी ग्वाही सामंत यांनी दिली. 'आपलीच भाषा बोलली पाहिजे असा अन्य राज्यातील लोकांचा दबाव मुंबई, ठाणे, मुंब्रा, पुणे येथे काही लोक आणत आहेत. गेल्या




तीन महिन्यांत हे प्रकार वाढल्याचे दिसून येत आहे. याबद्दलचा कायदा आहे. परंतु असा दबाव आणून मराठी भाषा बोलल्याबद्दल जर मारहाण होत असेल, तर हा कायदा कडक झाला पाहिजे, महाराष्ट्रात प्रत्येक जाती-धर्माचा माणूस राहतो. प्रत्येक भाषकाचा आदर केला आहे. भाषेचा अनादर केलेला नाही. परंतु काही लोक जाणीवपूर्वक मराठी भाषा, माणसाला त्रास देण्याचे काम करत असतील, तर कठोर कायद्याद्वारे शासन झाले पाहिजे. मराठीचे अस्तित्व, अस्मिता टिकविण्याची कार्यवाही केली पाहिजे, असे सामंत यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले. या विषयासंदर्भात पोलीस अधीक्षकांच्या बैठकीनंतर आवश्यकता भासल्यास शासन अध्यादेश काढण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## तेलगी प्रकरणात राजीनामा घेण्याची शरद पवारांना घाई; छगन भुजबळ यांचा आरोप


■ पुणे : अभिजीत येरल्लू

'तेलगी प्रकरणाशी कोणताही संबंध नसताना शरद पवार यांनी माझा उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्रीपदाचा राजीनामा घेतला. मात्र, त्यानंतर झालेल्या चौकशीमध्ये माझ्यावरील कोणतेही आरोप सिद्ध झाले नाहीत. त्यामुळे एक प्रकारे शरद पवार यांनी माझा राजीनामा घेण्याची घाई केली,' असा आरोप राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (अजित पवार) ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी येथे केला. 'सध्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष म्हणून राजकीयदृष्ट्या भाजपबरोबर आहोत. मात्र, आम्ही भाजपबरोबर लग्न केलेले नाही,' अशी टिप्पणीही त्यांनी केली. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या वतीने नऱ्हे येथील संस्थेच्या सभागृहात आठव्या युवा संसदेमध्ये 'संसद कट्टा' अंतर्गत भुजबळ यांची मुलाखत 'लोकमत'चे संपादक संजय आवटे यांनी घेतली. त्यानंतर संस्थेच्या वतीने प्रसिद्धीस देण्यात आलेल्या पत्रकामध्ये ही माहिती देण्यात आली आहे.





इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यावेळी उपस्थित होते. 'सन २०१४ मध्ये शरद पवार यांनी भाजपला बाहेरहून पाठिंबा दिला. त्यानंतर अनेक वर्षे भाजपला पाठिंबा देण्यासंदर्भात पक्षाची भूमिका तळ्यात-मळ्यात होती. मात्र, मी अजित पवार यांच्यासमवेत राहण्याचा निर्णय घेतला. सध्या राष्ट्रवादी पक्ष राजकीय दृष्ट्या भाजपबरोबर आहे.' असे भुजबळ यांनी सांगितले. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांमुळे मी सर्वसामान्य भाजी विक्रेता असतानाही राज्याचा उपमुख्यमंत्री झालो. त्यानंतर मंडल आयोगाला पाठिंबा देण्याच्या भूमिकेसंदर्भात त्यांच्याशी वैचारिक मतभेद झाल्यामुळे मी शिवसेनेतून बाहेर पडलो. मी जर शिवसेनेतून बाहेर पडलो नसतो, तर त्याचवेळी राज्याचा मुख्यमंत्री झालो असतो. शरद पवार यांच्यासोबत गेल्यावरही मुख्यमंत्री होण्याची संधी होती. (शेष पृष्ठ २ वर)




# राजकारण आणि विकासाचा मेळ

राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) जोपर्यंत मजबूत राहिली, तोपर्यंत त्यांनी व्होट बँक सांभाळण्याकडे कमी आणि अर्थव्यवस्थेवर जास्त लक्ष दिले; पण एनडीएची मतपेटी थोडीशी कमकुवत झाल्याने सरकार अर्थव्यवस्थेसोबतच मतपेटी व्यवस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. सरकारला धोरण बदलण्यास भाग पडले आहे. यंदाचा अर्थसंकल्प दिल्ली आणि बिहार विधानसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून तयार करण्यात आला आहे. विधानसभा निवडणुकीत सत्ताधारी पक्षाला धार मिळावी, यासाठी बिहारसाठी उदार आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दिल्लीत मध्यमवर्गाला आकर्षित करण्यासाठी आयकरात सूट जाहीर करण्यात आली आहे, ज्यामुळे सर्वसामान्यांना दिलासा मिळेल आणि विरोधी पक्षांवर दबाव येईल. याव्यतिरिक्त आंध्र प्रदेशच्या कोलावरम प्रकल्पासाठी दिलेला निधी यासारखे सरकारसाठी महत्त्वाचे असलेल्या राज्यांना विशेष आर्थिक पॅकेजही देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे पंजाब आणि हरियाणामध्ये शेतकरी समुदायाला आकर्षित करण्यासाठी कृषी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी नवीन योजनांचा समावेश करण्यात आला आहे. राजकारण बाजूला ठेवून केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ ने भारताच्या मंद होत चाललेल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी 'गुंतवणूक'वरून 'उपभोग'वर लक्ष केंद्रित केले आहे. कोरोना नंतरच्या पुनर्प्राप्ती टप्प्यात स्थिर गुंतवणुकीला सतत प्रोत्साहन देऊन खासगी, कॉर्पोरेट क्षेत्रातील गुंतवणूक सुधारण्यासाठी सरकारने अनेक तरतुदी केल्या आहेत; मात्र यातून काहीही साध्य झाले नाही. गुंतवणुकीचा एकूण दर (एकूण निश्चित भांडवलनिर्मिती) गेल्या १०-११ वर्षांमध्ये जीडीपीच्या जवळपास ३१ टक्क्यांवर स्थिर राहिला आहे, जो आर्थिक वर्ष २००८ मध्ये ३५-३६ टक्के होता. आर्थिक वर्ष २०२५ हे कॉर्पोरेट क्षेत्रासाठी खूपच निराशाजनक ठरले आहे. मागणीचा अभाव यासाठी जबाबदार धरला जात आहे. मागणीतील मंदीचे श्रेय उच्च अन्नधान्य महागाई, वास्तविक मजुरी, असंघटित उत्पादन क्षेत्रातील रोजगारातील घट आहे. हे लक्षात घेऊन केंद्र सरकारने २०२५ च्या अर्थसंकल्पात १२ लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक उत्पन्नावर 'शून्य कर', मूळ सूट मर्यादेत वाढ, ज्येष्ठ नागरिकांसाठी कर कपातीची मर्यादा दुप्पट करणे आणि पालन सुलभतेमध्ये सुधारणा प्रस्तावित केली आहे. भारतात प्रौढ लोकसंख्येपैकी केवळ २-३ टक्के लोक आयकर भरणारे आहेत, तर फ्रान्समध्ये ७८.३ टक्के लोक कर भरतात. जर्मनीमध्ये ६१.३ टक्के, इंग्लंडमध्ये ५९.७ टक्के आणि अमेरिकेमध्ये हे प्रमाण ५०.५ टक्के आहे. सरकारने जाहीर केलेल्या कर सवलतींसह वैयक्तिक आयकर प्राप्ती आर्थिक वर्ष २०२६ मध्ये १४.४ टक्के वाढण्याची अपेक्षा आहे, तर त्यांची वाढ आर्थिक वर्ष २०२५ मध्ये २०.३ टक्के आहे आणि आर्थिक वर्ष २०२४ मध्ये २५.४ टक्के होती. उपभोगातून गुंतवणुकीकडे लक्ष केंद्रित केल्याने सरकारने आर्थिक वर्ष २०२५ साठी भांडवली खर्च ११.११ लाख कोटी रुपयांवरून १०.१८ लाख कोटी रुपयांवर कमी केला आहे. सरकारला खासगीकरणाच्या प्राप्तीमध्ये उच्च वाढ अपेक्षित आहे. असे होईल की नाही, हे सांगणे कठीण वाटत असले, तरी वरवर पाहता प्रत्येकासाठी काहीतरी असणारा हा अर्थसंकल्प आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी उचललेल्या पावलांचा परिणाम अर्थसंकल्पावरही स्पष्ट दिसत आहे. ट्रम्प यांच्या इमिग्रेशन विरोधी मोहिमेनंतर आणि अमेरिकेतील एच-१बी जन्मसिद्ध नागरिकत्व रद्द करण्याच्या चर्चेनंतर आता अमेरिकेत नोकरी मिळणे सोपे जाणार नाही, हे निश्चित झाले आहे. त्यामुळे भारतीय तरुणांमध्ये बेरोजगारी वाढण्याची भीती आहे. देशातच रोजगारनिर्मितीसाठी सरकारला पावले उचलावी लागतील. अर्थसंकल्पात सरकारने स्टार्टअप इकोसिस्टम विकसित करण्यावर भर देऊन पुढाकार घेतला आहे.



# 'जीबीएस' चे आव्हान!

**महाराष्ट्रासमोर जीबीएस 'गुएलेन बॅरी सिंड्रोम' आजाराचे आव्हान असले तरी रुग्ण बरे होण्याची वाढती संख्या ही दिलासा देणारी आहे. कोविड काळात व्यक्तीगत स्वच्छतेबाबत सजग असलेले नागरिक मास्कबंदी उठल्यानंतर आणि लस घेतल्यावर काहीसे निष्काळजी झाले होते, मात्र आता पुन्हा विशेषतः पिण्याचे पाणी, अन्न आणि व्यक्तीगत स्वच्छतेबाबत पुरेशी काळजी घ्यावी लागणार आहे, परंतु संसर्गाचे प्रमाण कोविडइतके नसल्याने आणि रुग्ण बरे होण्याची संख्या पाहता घाबरून न जाता सरकारच्या आरोग्य विभागाने केलेल्या सूचनांचे पालन करण्याची आवश्यकता आहे. सोबतच सरकारी यंत्रणाही सतर्क झाल्या असून त्यांना सहकार्याचीच भूमिका नागरिकांनी घ्यायला हवी.**


'जीबीएस' आजाराचे रुग्ण आढळलेल्या भागात सर्वेक्षणासाठी आठ रुग्णालय झोन तयार करण्यात आले आहेत. तसेच १६ पथके तयार करण्यात आली आहेत. या पथकांनी शनिवारचा दिवस मावळेपर्यंत जवळपास दहा हजार संशयित घरांची तपासणी केली. त्यात या आजाराचा एकही रुग्ण आढळला नसल्याने ही दिलासा देणारी बाब आहे, परंतु त्यामुळे नागरिकांनी सतर्कतेच्या सूचना टाळता कामा नयेत. दूषित पाण्यातून या आजाराचा फैलाव होत असल्याची दाट शक्यता असल्याने पाणीपुरवठा करणाऱ्या पालिकांची जबाबदारी वाढली आहे.

पुण्यातील पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रात या आजाराचे संशयित असे १५ रुग्ण दाखल आहेत. यातील सहा रुग्णांना घरी सोडण्यात आले आहे. इतर रुग्णांचीही प्रकृती स्थिर असल्याने योग्य वेळीच औषधोपचार मिळाल्यास या आजाराला घाबरण्याचे कारण नसल्याने स्पष्ट व्हावे. सोबतच आजार होऊच नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना आवश्यक आहेत. या आजाराबाबत समाजमाध्यमांवर अफवा पसरवणे, दिशाभूल करणारी माहिती देणाऱ्यांना वेळीच रोखायला हवे. त्यामुळे जनजागृतीपेक्षा भीती पसरते आणि बरेचदा आजारापेक्षा आजाराची भीती जास्त धोकादायक ठरते. या आजारावरील औषधे पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रुग्णालयात उपलब्ध आहेत तसेच सरकारच्या आरोग्य सुविधांच्या योजनेतही या आजाराचा समावेश असल्याने नागरिकांना मोफत उपचाराची सुविधा आहे. या आजाराला रोखण्यासाठी आठ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. यात आजारी रुग्णांविषयी सर्वेक्षण, उपचाराबाबत समन्वय, माहितीचे संकलन आणि योग्य उपचार अशी दिशा आहे. या आजाराविषयी योग्य आणि पुरेशी माहिती मिळण्यासाठी हेल्पलाईनही सुरू करण्यात आली आहे.

राज्यातील विविध महापालिकांनी वेळीच सावध होऊन पाणीपुरवठा आणि स्वच्छतेबाबत उपाययोजना करण्याची गरज आहे. ज्या भागात टँकरने पाणीपुरवठा केला जातो, त्या ठिकाणी विशेष काळजी घेण्याची गरज आहे. येत्या काळात उष्मा वाढेल तशी टँकर्सची संख्याही वाढणार आहे. खासगी ठिकाणाहून प्रक्रिया न करता पाण्याचा उपसा करणारे आणि असे पाणी पुरवणाऱ्या टँकर्सच्या बाबतही हा धोका अधिक आहे. पाणी उकळून आणि गाळून पिण्याची आवश्यकता आहे. अन्न स्वच्छ आणि ताजे असायला हवे. दूषित किंवा बाहेरचे अन्न टाळायला हवे. वैयक्तिक स्वच्छतेवर भर द्यायला हवा. हा आजार हवेतून फैलावण्याचे प्रमाण स्पष्ट नाही, परंतु अन्नपाण्यातून या आजाराचा संसर्ग होऊ शकतो. परिणामी त्याबाबत काळजी घ्यायला हवी. कच्चे मांस टाळावे. शिजलेले ताजे आणि गरम अन्न खावे. शिजवलेले अन्न आणि न शिजवलेले अन्न एकत्र ठेवता कामा नये. दूषित पाण्यातून संसर्गाची शक्यता लक्षात घेता उकळलेले पाणी पिण्यासाठी वापरावे. सोबतच दूषित थंड पाणी टाळायला हवे. आजाराची लक्षणे दिसताच वेळीच वैद्यकीय सल्ला आवश्यक आहे. हातापायांना मुंग्या येणे, अन्न गिळण्यास त्रास होणे, धाप लागणे, श्वास घेण्यास अडथळा येणे, जुलाब अशी लक्षणे दिसल्यास दुर्लक्ष करू नये. या आजारावर उपचार शक्य आहे. त्यामुळे घाबरून जाऊ नये. सर्व प्रकारच्या वयोगटात या आजाराची लक्षणे आढळू शकतात, मात्र अत्यल्प रुग्णांमध्ये आजाराची तीव्र लक्षणे आढळत आहेत. त्यामुळे भीती न बाळगता व्यक्तीगत स्वच्छता आणि पाणी तसेच अन्नसेवनाविषयी काळजी घेण्याची गरज आहे.

पुणे वगळता महाराष्ट्रात अद्याप या आजाराचा संसर्ग समोर आलेला नाही. त्यामुळे सुरुवातीपासूनच काळजी घेण्याची गरज आहे. ठाणे जिल्ह्यात तसेच महाराष्ट्राच्या अनेक भागात खासगी टँकरचे पाणी मागवले जाते. असे दूषित पाणी पिण्यासाठीही वापरले जाते. दूषित पाणी स्वच्छ पाण्याच्या संपर्कात येता कामा नये. येत्या काळात राज्यात पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. त्यावेळी टँकर्सनी पाणीपुरवठा सुरू झाल्यावर पालिकांची जबाबदारी वाढणार आहे. अनेक ठिकाणी नागरी वस्त्यांमध्ये टंचाईच्या काळात खासगी पद्धतीने पाणी मागवले जाते. यावेळी अशा पाण्याचा उपसा आणि साठवणूक करताना आवश्यक ती खबरदारी घेतली जात नाही. या पाण्याचे नमुने तपासणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत या आजाराविषयी संशोधन केले जात आहे. तोपर्यंत व्यक्तीगत स्वच्छता अत्यंत महत्त्वाची आहे.

देशाच्या विविध भागात या आजाराचे संशयित रुग्ण आढळत आहेत. महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, तेलंगणा, राजस्थानातही संशयित रुग्ण आढळले आहेत. पिण्याच्या पाण्यावर क्लोरिन प्रक्रिया करणे आवश्यक झाले आहे. ही प्रक्रिया करतानाही त्यात कुठलाही निष्काळजीपणा आजाराचा संसर्ग वाढवू शकतो. राज्यातील पाणीपुरवठा प्रकियेशी संबंधित विभागांनी वेळीच योग्य दिशेने काळजी घेतल्यास या आजाराला वेळीच रोखता येईल. पाण्याच्या स्वच्छ शुद्धिकरण प्रक्रियेतील निकषांचे पालन करण्यासाठी आणि त्यावर लक्ष ठेवण्यासाठी सरकारी पातळीवर धोरणात्मक कार्यवाही व्हायला हवी. या आजाराला कारण असलेला बॅक्टेरिया प्राथमिक संशोधनाच्या स्तरावर असल्याने आजाराची शक्यताच रोखता यायला हवी. या बॅक्टेरियाच्या संक्रमणाची ठिकाणे आणि त्याचा संसर्ग याविषयी अभ्यास केला जात आहे. येत्या काळात याबाबत अधिक माहिती स्पष्ट होईल. तोपर्यंत नागरिकांनी काळजी घ्यायला हवी. पुरेशी झोप, बाहेरील अन्नपाणी टाळणे तसेच स्वच्छता अंगीकारून या आजाराला रोखता येईल.



# स्ट्रेस फ्री राहण्यासाठी काय करावे?

दिवसेंदिवस मानसिक आजाराच्या रुग्णांमध्ये झपाट्याने वाढ होत आहेत. मानसिक आजारांमुळे लोकांमध्ये निराशा वाढत आहे. धावपळीच्या या जगात स्ट्रेस तर रोजच्या रुटीनचा एक भाग झाला आहे. स्पर्धेच्या या युगात आपणही टिकावे यासाठी अतोनात प्रयत्न केले जात आहेत. या प्रयत्नाच्या नादात मात्र आरोग्याकडे दुर्लक्ष होत आहे. स्ट्रेसमुळे अनेक शारीरिक, मानसिक आजार होत आहेत. व्यक्तींचे जगणे अवघड झाले आहे. अशावेळी निरोगी राहण्यासाठी स्ट्रेसपासून दूर राहणे गरजेचे आहे. स्वत:पासून स्ट्रेस दूर ठेवणे वाटते तितके अवघड नाही. तुम्ही रोजच्या रुटीनमध्ये काही बदल केल्यास हे नक्कीच सहज शक्य आहे.

- ☞ शारीरिक आणि मानसिक स्ट्रेसपासून दूर राहण्यासाठी सर्वात सोपा मार्ग योगाचा सराव करणे सांगितले जाते. योगाच्या सरावाने केवळ मानसिकच नाही तर शारीरिक आरोग्यास फायदा होतो.
- ☞ योगाप्रमाणेच ध्यानही करता येते. रोज सकाळी १० ते १५ मिनिटे ध्यान केल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. ध्यान केल्याने मानसिक आरोग्य सुधारते.
- ☞ संशोधनानुसार, निरोगी खाल्ल्याने मानसिक आरोग्य सुधारते. त्यामुळे हेल्दी खावे. जंक फूड, तेलकट, मसालेदार पदार्थ खाणे टाळावे.
- ☞ स्ट्रेसपासून दूर राहण्यासाठी आहारात हिरव्या भाज्या, नट्स, ताज्या फळांचा समावेश करावा. यामध्ये व्हिटॅमिन्स, आयर्न्स आढळतात, ज्याद्वारे स्ट्रेस कमी होण्यास मदत मिळते.
- ☞ चहाने फ्रेश वाटते हे खरं आहे. पण, आरोग्यासाठी दुधाचा चहा हानिकारक असतो. तुम्ही चहाऐवजी ग्रीन टी, हर्बल टी चे सेवन करावे. या चहा प्यायल्याने स्ट्रेस कमी होतो.
- ☞ पाण्याच्या कमतरतेमुळे स्ट्रेस निर्माण होतो. त्यामुळे स्ट्रेसपासून दूर राहण्यासाठी रोज किमान ३ लिटर पाणी प्यावे.
- ☞ वाढता स्क्रीनटाइम म्हणजेच मोबाईल आणि सोशल मीडियाच्या या जगात स्ट्रेस लहानांपासून-मोठ्यांपर्यत सर्वानाच जाणवत आहे. त्यामुळे स्ट्रेसपासून दूर राहण्यासाठी मोबाइल, टिव्ही राहा.

पान १ वरुन...

## अर्थसंकल्प केवळ...

अर्थसंकल्पाच्या नीतिमत्तेचे वर्णन त्यांच्या स्वत:च्या शब्दांत करताना त्या म्हणाल्या, अब्राहम लिंकनच्या शब्दांत लोकशाहीत म्हटल्याप्रमाणे, हा लोकांचा, लोकांसाठीचा अर्थसंकल्प आहे. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवल्यामुळे त्यांच्या हाती अधिक पैसे राहतील, ज्यामुळे देशांतर्गत वस्तू-सेवांची मागणी, बचत आणि गुंतवणूक वाढेल.

## ...अन्यथा भारतात...

इलेक्ट्रिक कारचा असो किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या गॅझेटचा असो. त्या डेटावर चीनचे नियंत्रण आहे. त्याच वेळी, जर आपण वापराच्या डेटाबद्दल विचार केला तर त्यावर अमेरिकेचं वर्चस्व आहे. आपल्याला उत्पादन नेटवर्कवर काम करावं लागेल. या क्षेत्रात चीन आपल्यापेक्षा १० वर्षे पुढे आहे. तो गेल्या १० वर्षांपासून बॅटरी, रोबोट आणि मोटर्सवर काम करत आहे. आपल्याला या तंत्रज्ञानावर काम करावे लागेल. डेटाशिवाय, एआयच्या क्षेत्रात क्रांती होऊट शकत नाही, असं राहुल गांधी यांनी ठामपणे सांगितलं. मेक इन इंडियाचा संदर्भ देत राहुल गांधींनी फोन दाखवला आणि म्हणाले की जर आपण म्हणलो की तो भारतात बनलेला आहे, तरी त्याचे भाग चीनमधून आले आहेत आणि ते येथे असेंबल केले गेले आहेत. आम्ही उपभोगावर लक्ष केंद्रित केलं त्यामुळे समाजात असमानता वाढली. प्रश्न असा आहे की एआय कोणता डेटा वापरत आहे. भारताकडे कोणताही डेटा नाही. एआय चीनी किंवा अमेरिकन डेटा वापरेल, अशी शक्यताही त्यांनी व्यक्त केली आहे.

## स्वतःची चूक झाकण्यासाठी...

पण धनंजय मुंडेंच्या टोळीमुळे चौथा अंक पाहायला मिळाला.आरोपींच्या बाजूने मोर्चे निघाले.जातीयवादाचा अंक भयंकर आहे.असं मनोज जरांगे म्हणाले. संतोष देशमुख हत्या प्रकरणाला आता दोन महिने होत आले आहेत.या प्रकरणात संत महंतांनी उडी घेतल्याने राजकीय वातावरण तापू लागलं आहे. बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवारांचा अध्यक्षतेखाली नियोजन समितीची बैठक झाल्यानंतर मंत्री धनंजय मुंडे भगवानगडावर मुक्कामी गेले होते.त्यानंतर भगवानगडाचे महंत नामदेव शास्त्री यांनी धनंजय मुंडे निर्दोष असल्याचं सांगितलं.यानंतर धनंजय देशमुख यांच्यासह त्यांचे संपूर्ण कुटुंब भगवानगडावर आज जाणार आहे.या संपूर्ण प्रकरणातील सर्व पुरावे नामदेव शास्त्री यांच्या समोर ठेवत न्यायाची मागणी करणार आहेत.

## एकनाथ शिंदेंनी सामना...

कोणत्याही शिवसैनिकाची, आमदारांची, खासदारांचे असं मत नसल्याचे ते म्हणाले. आज जे आमदार आणि खासदार एकनाथ शिंदे यांनी निवडून आणले आहेत, त्यासाठी प्रचंड असा निधी मतदारसंघात दिला आहे म्हणून आमदार निवडून आले आहेत. उद्धव साहेब ठाकरेंकडे असते, तर पाच दहा आमदार देखील निवडून आले नसते, अशी टीका त्यांनी केली. उद्धव ठाकरे स्वतःला हुकुमशाह समजतात, शिवसेनाप्रमुखांच्या पाठीत खंजीर खुपसला, त्यांच्या विचारांना काळीमा फासली. बेईमानी करून विचारांना हरताळ फासून ते काँग्रेस सोबत जाऊन मुख्यमंत्री झाले. म्हणून उद्धव ठाकरेंसोबत जाण्याचा प्रश्न उद्भवत नाही. दोन्ही शिवसेना कदाचित एकत्र होऊ शकत नाही ही काळ्या दगडावरची रेघ असल्याचे ते म्हणाले. शिरसाट यांना का प्रेम उफाळून आलं याचे उत्तर तेच देतील त्यांचं ते मत वैयक्तिक आहे पक्षाचं नाही, असेही त्यांनी सांगितले.

## तेलगी प्रकरणात राजीनामा...

मात्र, ओबीसींच्या लढ्यासाठी मुख्यमंत्री होण्याच्या दोन संधी सोडून दिल्या. माझ्यासाठी पद महत्त्वाचे नाही तर, ओबीसी समाजाचे प्रश्न महत्त्वाचे आहेत. त्यासाठी मी पद नसतानाही लढत राहणार आहे.' असे भुजबळ यांनी स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेपासून असणारा मी ज्येष्ठ नेता आहे. अजित पवारांसमवेत गेल्यानंतरही मला मंत्रिपद मिळाले नाही, याची खंत वाटते. मला मिळणारे पद महत्त्वाचे नाही. मात्र, मानसन्मान मिळाला नाही, तर माणूस दुःखी होतो, अशी खंतही भुजबळ यांनी व्यक्त केली. राज्यपाल होऊन सर्वसामान्यांसाठी मी बोलू शकणार नाही.

## एकनाथ शिंदेंनी सामना...

एकनाथ शिंदे म्हणाले, 'मराठी भाषेला अडीच वर्षांपूर्वी अभिजात दर्जा मिळाला, हा राज्यातील जनतेच्या अस्मितेचा विषय आहे. आपल्या भाषेत उत्तम साहित्य निर्माण होते, हे आपण दाखवून दिले आहे. आम्ही राजकीय कार्यकर्ते, तसेच भाषेचेही कार्यकर्ते आहोत. आम्ही मराठी भाषेसाठी जे जे काही करता येईल, ते आम्ही सरकारच्या माध्यमातून करू.'

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई - ४०० ०१८.**

| | |
|---|---|
| Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in | ☎ ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स २४९३१९०२ |
| जा.क्र.का.अ./ममुंवि/ई-निविदा/ ४५६ | दिनांक :- ३१/०१/२०२५ |

**ई निविदा सूचना क्रमांक १८ सन २०२४-२५ (शुध्दीपत्रक क्र.२)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ सदर कामासाठी असलेल्या निविदा अटी व शर्ती प्रमाणे पात्रता प्राप्त अनुभवी कंत्राटदाराकडून **"इपीसी (अभियांत्रिकी, खरेदी व बांधकाम)** ( Engineering, Procurement and Construction)" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | मुंबई मंत्रालय परिसरात गार्डन गेट जवळ नवीन प्रशासकीय इमारतीचे (तळमजला + ७ मजले) बांधकाम करणे. | ७८.०९ |

**पूर्वी प्रसिध्द झालेले वेळापत्रक**

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दिनांक २९/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता ते दिनांक ०४/०२/२०२५ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा पुर्व बैठक- | दिनांक ३१/०१/२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजता (मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई ४ था मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांच्या दालनात) |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दिनांक ०५/०२/२०२५ रोजी १५.०० वाजता (अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां) मंडळ विभाग, यांचे कार्यालय, ५ वा मजला,बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई) |

**करण्यात आलेले बदल**

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | मुंबई मंत्रालय परिसरात गार्डन गेट जवळ नवीन प्रशासकीय इमारतीचे (तळमजला + ७ मजले) बांधकाम करणे. | ९८.२८ |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दिनांक ०४/०२/२०२५ रोजी १५.०० वाजता ते दिनांक १०/०२/२०२५ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा पुर्व बैठक- | दिनांक ०६/०२/२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजता (मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई ४ था मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांच्या दालनात) |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दिनांक ११/०२/२०२५ रोजी १५.०० वाजता (अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां) मंडळ विभाग, यांचे कार्यालय, ५ वा मजला,बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई) |

खालील संकेतस्थळावरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.

१. http://mahapwd.gov.in 2. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)

3 कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/६०१०

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press Unit No. 4, Ground Floor, N.K. Industrial Estate, Off. Aarey Road, Near Parvasi Ind Estate, Gate No.2, Goregaon(E), Mumbai- 400063 Maharashtra and published at 105-A-Wing, 1st Floor, Maa-Ashapura Chs Ltd. Near Gurunanak Hospital, BKC Link Road, Bandra (East), Mumbai-400051 Maharashtra. **Editor- Rakesh Shankar Gore.**
• Mail id : maharashtracrimetimes@gmail.com, Contact No- 9892386748 / 9803386748, Website : www.maharashtracrimetimes.com

# धारावी कुंभारवाड्याचे मुलुंड कचराभूमीच्या जागेवर पुनर्वसन?; जागा दाखविण्यासाठी नेल्याने रहिवासी संतप्त

■ मुंबई : राकेश गायकवाड

**धारावीमध्ये अनेक पिढ्यांपासून राहणाऱ्या कुंभारवाड्यातील रहिवाशांचे मुलुंड कचराभूमीच्या जमिनीवर पुनर्वसन करण्याचा घाट घातला जाण्याची शक्यता आहे. अलिकडेच यातील काही जणांनामुलुंडची जागा दाखविण्यासाठी नेण्यात आले होते. त्यामुळे कुंभारवाड्याचे रहिवासी संतप्त झाले असून आपल्याला धारावीमध्येच जागा देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.**

धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत मुलुंडमधील कचराभूमीची १० एकर जागा लवकरच ताब्यात घेतली जाणार आहे. धारावीमधील अपात्र रहिवाशांचे तेथे पुनर्वसन केले जाणार आहे. पात्र रहिवाशांना धारावीतच घरे दिली जाणार असताना कुंभारवाड्याच्या पुनर्वसनाबाबत धारावी पुनर्वसन प्रकल्पाने (डीआरपी) अद्याप कोणतेही ठोस धोरण जाहीर केलेले नाही. असे असताना नवभारत मेगा डेव्हलपर प्रायव्हेट लिमिटेडने (एनएमडीपीएल) कुंभारवाड्यातील रहिवाशांना बसमध्ये बसवून मुलुंड कचराभूमीची जागा दाखविण्यास नेले. आपल्याला फसवून तेथे नेल्याची आणि मुलुंडमध्ये पुनर्वसन अमान्य असल्याची ओरड रहिवाशांनी केल्यानंतर काही काळ गोंधळ झाला.

शंभर वर्षांहून अधिक काळ धारावीत राहणाऱ्यांचे धारावीबाहेर पुनर्वसन कसे, असा प्रश्न या रहिवाशांनी केला आहे. मूळच्या धारावीकरांनाही शहराबाहेर फेकण्याचा हा डाव असल्याचा आरोप या नागरिकांनी केला आहे.



दरम्यान, मुलुंडला गेलेल्या काही जणांनी अपात्र रहिवाशांसाठीही ती जागा अयोग्य असल्याचे म्हटले आहे. मुलुंडची जागा दाखविण्यास नेल्यामुळे कुंभारवाड्याचे रहिवासी संभ्रमित आणि संतप्त झाले आहेत. पात्र आणि मूळ धारावीकरांनाच बाहेर फेकण्याचा हा डाव असून धारावी बचाव आंदोलनाने त्याविरोधात आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती माजी आमदार बाबूराव माने यांनी दिली. धारावीतील एका रहिवाशाला धारावीबाहेर जाऊ दिले जाणार नाही, असा इशाराही माने यांनी दिला. कुंभारवाड्यातील रहिवाशांना मुलुंडला नेण्यात आले होते का आणि त्यांचे कचराभूमीच्या जागेवर पुनर्वसन केले जाणार का, अशी विचारणा एनएमडीपीएलकडे करण्यात आली होती. मात्र त्यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया उपलब्ध होऊ शकली नाही. तर या रहिवाशांना मुलुंडची जागा दाखविण्यास नेल्याबाबत आपल्याला अद्याप माहिती नसल्याचे डीआरपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.व्ही.आर. श्रीनिवास यांनी सांगितले. पुनर्वसन नियमानुसार आणि योग्य प्रकारे होईल, असेही ते म्हणाले. साडेबारा एकराच्या कुंभारवाड्याचे त्याच जागी सहा एकरांवर पुनर्वसन करावे. प्रदूषण टाळण्यासाठी राजस्थानच्या धर्तीवर अत्याधुनिक विद्युत भट्ट्यांची सुविधा देण्यात यावी, अशी मागणी कुंभारवाड्यातील रहिवाशांची मागणी आहे. दिशाभूल करून रहिवाशांना जागा दाखविण्यास नेणे, जबरदस्तीने जागेची मोजणी करणे, सर्वेक्षण करणे अशा गोष्टी त्वरित थांबवाव्या अशीही त्यांची मागणी असून तसे निवेदन आज, सोमवारी डीआरपीचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.व्ही.आर. श्रीनिवास यांना देण्यात येणार असल्याचे कुंभारवाड्यातील रहिवासी आदम यांनी सांगितले.

## वर्षाची सुरुवात बांधकाम व्यावसायिकांसाठी सकारात्मक, मागील १३ वर्षातील जानेवारीमधील घरविक्रीचा उच्चांक

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

वर्षाच्या सुरुवातीला अर्थात जानेवारी २०२५ मध्ये घरविक्रीला समाधानकारक सुरुवात झाली असून मुंबईत १२,२४९ घरांची विक्री झाली असून यातून सरकारला ९९४ कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे. मागील १३ वर्षातील जानेवारीतील घरविक्रीचा हा



उच्चांक आहे.

करोना काळानंतर प्रत्येक वर्षी घरांच्या विक्रीत वाढ होताना दिसत आहे. करोना काळात हक्काचे घर घेण्याकडे ग्राहकांचा कल वाढल्याने घरविक्रीत वाढ होत आहे. त्यामुळेच २०२३ च्या संपूर्ण कालावधील मुंबईत एकूण १ लाख २६ हजार ९०५ घरांची विक्री झाली होती. तर २०२४ मध्येही १ लाख २८ हजार २१२ घरे विकली गेली. आता नव्या वर्षाची सुरुवातही समाधानकारक झाली आहे. जानेवारी २०२५ मध्ये मुंबईत १२, २४९ घरांची विक्री झाली असून त्यातून मुद्रांक शुल्क वसूली रुपाने ९९४ कोटी रुपयांचा महसूल मिळाला आहे. मागील वर्षी, जानेवारी २०२३ मध्ये घरांच्या विक्रीची संख्या १०,९६७ अशी होती. मागील वर्षाच्या जानेवारी महिन्याच्या तुलनेत यंदाची घरविक्री अधिक आहे. पण त्याचवेळी गेल्या १३ वर्षांतील जानेवारी महिन्यातील घरविक्रीचा हा उच्चांक आहे. जानेवारी २०१३ मध्ये मुंबईत केवळ ५,५९९ घरांची विक्री झाली होती तर जानेवारी २०१४ मध्ये ५,४९७ घरे विकली गेली होती. जानेवारी २०१५ मध्ये ६२१४, २०१६ मध्ये ५१६३,२०१७ मध्ये ३६१९, २०१८ मध्ये ६२७०, २०१९ मध्ये ४६०५, २०२० मध्ये ६१५० घरांची विक्री झाली. करोना काळापासून अर्थात २०२१ पासून मात्र घरविक्री वाढ होत गेली त्यामुळेच जानेवारी २०२१ मध्ये घरविक्रीची संख्या ६१५० वरुन थेट १०, ४१२ वर गेली. जानेवारी २०२२ आणि २०२३ मध्ये ही संख्या काहीशी खाली आली. जानेवारी २०२२ मध्ये ८१५५ तर जानेवारी २०२३ मध्ये ९००१ घरांची विक्री झाली.

## एमएमआरडीएच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांना अर्थबळ: १२ हजार कोटीच्या कर्जासाठी राज्य सरकारची हमी

■ मुंबई : विशाल कारंडे

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या अंमलबजावणीसाठी ६० हजार कोटींच्या कर्जाची उभारणी करण्यास राज्य सरकारने याआधीच मान्यता दिली आहे. त्यानुसार रुरल इलेक्ट्रिफिकेशन लिमिटेड (आरईसी) या वित्तीय संस्थेकडून ३० हजार ४८३ कोटींची कर्ज उभारणी केली जाणार असून दुसऱ्या टप्प्यातील १२ हजार कोटींच्या कर्जासाठी नुकतीच सरकारने कर्ज हमी दिली आहे. त्यामुळे आता एमएमआरडीएच्या प्रकल्पांना अर्थबळ मिळणार असून प्रकल्प वेगाने मार्गी लावण्यास मदत होणार आहे. एमएमआरडीएकडून मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) मोठ्या संख्येने मेट्रो, सागरी सेतू, सागरी मार्ग, भुयारी मार्ग, बोगदे, उन्नत रस्ते, प्रवेश नियंत्रण मार्ग, उड्डाणपूल यासारखे विविध प्रकल्प हाती




घेण्यात आले आहेत. सध्या एक लाख कोटींहून अधिकचे प्रकल्प सुरु असून येत्या काळात एमएमआरडीएकडून यापेक्षाही अधिक किंमतीचे प्रकल्प राबवविले जाणार आहेत. यासाठी कोट्यवधींचा निधी आवश्यक असताना एमएमआरडीएची आर्थिक स्थिती नाजूक आहे. त्यामुळे एमएमआरडीएने कर्जाच्या रुपाने निधीची उभारणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार गेल्या वर्षी ६० हजार कोटींच्या कर्ज उभारणीच्या प्रस्तावास राज्य सरकारची मान्यता मिळवून घेतली. त्यामुळे पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठीची आर्थिक अडचण दूर होण्यास मदत झाली आहे.

सरकारच्या मान्यतेनुसार एमएमआरडीएने भारत सरकारचा उपक्रम असलेल्या मेसर्स आरईसी या वित्तीय संस्थेकडून ३० हजार ४८३ कोटींचे कर्ज उभारण्यास प्राधिकरणाची मंजुरी घेतली. या मंजुरीनुसार कर्जास सरकारची हमी आवश्यक होती. त्यानुसार सरकारने याआधी आरईसीकडून पहिल्या टप्प्यात १२ हजार कोटींच्या कर्जासाठी हमी देत कर्ज घेण्याचा मार्ग मोकळा केला होता. तर आता या वित्तीय संस्थेकडून दुसऱ्या टप्प्यात १२ हजार कोटींचे कर्ज घेण्यास हमी दिली आहे. हमी शुल्क माफ दुसऱ्या टप्प्यातील १२ हजार कोटी रुपयांच्या कर्जास हमी देण्याबाबतचा शासन निर्णय शुक्रवार, ३० जानेवारी रोजी वित्त विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यामुळे आता पायाभूत सुविधांसाठी १२ हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

## पंढरपुरात वसंत पंचमीनिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणीचा शाही विवाह सोहळा

■ मुंबई : सम्यक कासारे

आजपर्यंत अनेक विवाह सोहळे झाले, होतील. पण जर देव देवतेचा विवाह असेल तरष्ठ असाच एक विवाह सोहळा वसंत पंचमीच्या मुहूर्तावर येथील श्री विठ्ठल रखिमणीचा झाला, तोही शाही पद्धतीने. मंगल अक्षता, सनई चौघडे आणि उपस्थित वऱ्हाडी मंडळींच्या साक्षीने हा विवाह सोहळा पार पडला. वसंत पंचमी ते रंगपंचमीपर्यंत देवाला शुभ्र पोशाख करून मूर्तीवर गुलालाची उधळण करण्याची परंपरा आहे. त्यानुसार देवाला पांढरा शुभ्र पोशाख परिधान करण्यात आला. दरम्यान, या विवाह सोहळ्यासाठी भाविकांची गर्दी दिसून आली.




वास्तविक पाहता शिशिर म्हणजे थंडी संपून वसंत म्हणजे उन्हाळा सुरू होतो. सतत सुंदर भासणारा निसर्ग वसंत ऋतूत सोळा कलांनी फुलून उठतो. वसंतच्या आगमनाने सर्व सृष्टी फुलून जाते. सर्वत्र चैतन्याचे वातावरण तयार होते. आजचा दिवस रती आणि कामदेवाच्या पूजेचा असल्याचे मानल जाते. वसंत ऋतूच्या आगमनाने सर्व सृष्टीमध्ये चैतन्य असल्याचे हे प्रतीक आहे. या ऋतुमध्ये पांढरे वस्त्र परिधान केले तर उन्हाची तीव्रता कमी होते.

## राज्यातील ७८.४० टक्के शाळांमध्ये संगणक वाचन, गणित विषयात प्रगती, शालेय शिक्षण विभागाचा दावा

■ मुंबई : नितीन देवळेकर

राज्यातील एकूण शाळांपैकी ७८.४० टक्के शाळांमध्ये संगणक उपलब्ध असून १ लाख ८ हजार ४४४ शाळांमध्ये संगणक वापराचे प्रमाण ७२.९५ टक्के, असा दावा शालेय शिक्षण विभागाकडून करण्यात आला आहे.

प्रथम एज्युकेशन फाऊंडेशन या संस्थेने एकूण शाळांच्या केवळ ०.८१ टक्के इतक्या शाळांचेच सर्वेक्षण केलेले आहे. राज्यात गणितीय क्रिया यामध्ये विद्यार्थ्यांची संपादणूक व अध्ययन स्तर हा वाढला आहे. शासकीय शाळांमध्ये सन २०२२ च्या तुलनेमध्ये सन २०२४ मध्ये वाचनामध्ये १०.९ टक्के प्रगती दिसून येते. तर खासगी शाळांमध्ये वाचनामध्ये ८.१ टक्के प्रगती दिसून येते. गणितीय क्रियांमध्ये शासकीय शाळांमध्ये १३.१ टक्के प्रगती दिसून येते व खासगी शाळांमध्ये ११.५ टक्के प्रगती दिसून येते.



एकूण १ लाख ८ हजार १४४ शाळा आहेत. त्यापैकी केवळ ४०९ प्राथमिक आणि ४६३ उच्च प्राथमिक व त्यावरील ग्रामीण भागातील ८७२ शाळांचेच सर्वेक्षण संबंधित संस्थेकडून करण्यात आले आहे. राज्यातील एकूण २,०९,६१,८०० शालेय विद्यार्थ्यांपैकी केवळ ३३,७४६ मुलांचे सर्वेक्षण संस्थेने केले आहे जे की एकूण विद्यार्थ्यांच्या केवळ ०.१६ टक्के इतके आहे.

वय वर्ष ६ ते १४ मधील ६०.९ टक्के बालके ही शासकीय शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत, तर ३८.५ टक्के बालके ही खासगी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. इयत्ता पहिली व दुसरीमधील वाचन व

इयत्ता तिसरीतील मुले जी इयत्ता दुसरीच्या पातळीचे वाचन करू शकतात याचे महाराष्ट्राचे प्रमाण देशपातळीपेक्षा १० टक्क्यांनी जास्त आहे. इयत्ता तिसरीमध्ये गणितीय क्रियांमध्ये विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये महाराष्ट्र हा देशातील पहिल्या पाच राज्यांमध्ये आहे. २०२२ च्या तुलनेमध्ये २०२४ मध्ये यात १३ टक्क्यांची वाढ दिसून येते. इयत्ता पाचवीच्या मुलांमध्ये सन २०२२ च्या तुलनेमध्ये सन २०२४ मध्ये वाचनामध्ये २.२ टक्के अधिकची प्रगती झाल्याचे दिसून येते. सर्वात कमी शाळाबाह्य विद्यार्थी असणाऱ्या राज्यांमध्ये महाराष्ट्र हे एक राज्य आहे.

## धुळीची समस्या नियंत्रणात आणण्यासाठी पालिका अद्ययावत यंत्रे खरेदी करणार

■ मुंबई : गणेश बागडे

हवेचा दर्जा सुधारण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने कंबर कसली आहे. यासाठी पालिकेने विविध उपाययोजना राबविल्या असून अद्ययावत यंत्रांच्या खरेदीवरही भर दिला आहे. मुंबईतील धुळीवर नियंत्रण मिळविण्यासाठी पालिकेने बॅटरीवर चालणारी धूळ शोषणारी यंत्रे (डस्ट सक्शन मशीन) खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. यासाठी सन २०२५-२६ च्या अर्थसंकल्पात विशेष तरतूद करण्यात आली आहे. येत्या पाच ते सहा महिन्यात ही यंत्रे कार्यान्वित करण्याचा पालिकेचा मानस आहे.

मुंबईत ठिकठिकाणी सुरू असलेली विकासकामे, रस्त्यांवरील धूळ आणि वाहनांमधून निघणारा धूर आदी विविध कारणांमुळे गेल्या अनेक दिवसांपासून मुंबईतील हवेचा दर्जा ढासळत आहे. परिणामी, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. हवा प्रदूषण नियंत्रणात आणण्यासाठी महापालिका प्रशासनाने मुंबईत सुरू असणाऱ्या बांधकाम आणि विकासकांसाठी डिसेंबरमध्ये विविध मार्गदर्शक सूचना जारी केल्या होत्या. त्यांनतर काही प्रमाणात हवेत सुधारणा झाल्याचेही समोर आले होते. मात्र, काही ठिकाणी हवेचा दर्जा खालावलेलाच दिसून येत आहे. हवा प्रदूषणाला कारणीभूत ठरणारी रस्त्यावरील धूळ नियंत्रणात आणण्यासाठी महापालिकेने आता धूळ शोषणारी यंत्रे (डस्ट सक्शन मशीन) खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे.

हवा प्रदूषणासंदर्भातील विविध बाबींचा अभ्यास केल्यानंतर महापालिकेचा पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग आता सुमारे धूळ शोषणारी १०० यंत्रे खरेदी करणार आहे. यासाठी ४० कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

येत्या पाच ते सहा महिन्यात पालिकेच्या सर्व विभाग कार्यालयांच्या हद्दीत ही यंत्रे कार्यान्वित करण्याचा पालिकेचा प्रयत्न आहे.



## निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी काँग्रेसची समिती; मतदारयाद्यांमधील घोळाचा आढावा घेण्याचा निर्णय

■ मुंबई : मेहुल गायकवाड

निवडणूक प्रक्रिया मुक्त आणि मोकळ्या वातावरणात तसेच निष्पक्षपातीपणे होते की नाही यावर देखरेख ठेवण्यासाठी काँग्रेस पक्षाने ज्येष्ठ नेत्यांचा समावेश असलेली समिती स्थापन केली आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत मतदार याद्यांच्या झालेल्या घोळाचा ही समिती सर्वात आधी आढावा घेणार आहे.

पक्षाने निवडणूक प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यासाठी 'ईगल' हा कृती गट स्थापन केला आहे. निवडणूक आयोगाकडून मुक्त आणि मोकळ्या वातावरणात निवडणुका पार पाडल्या जातात की नाही यावर हा कृती गट लक्ष ठेवणार आहे.




या कृती दलात अजय माकन, दिग्विजय सिंग, अभिषेक मनू संघवी, प्रवीण चक्रवर्ती, पवन खेरा, गुरदीप सिंग सप्पल, नितीन राऊत, चल्ला वनसी चांद रेड्डी या नेत्यांचा समावेश करण्यात आला आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या काळात मतदारयाद्यांमध्ये झालेल्या गोंधळाची समिती चौकशी करणार आहे. या समितीत राज्यातील नितीन राऊत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. 'मतदारांची संख्या वाढली कशी?' राज्यात २०१९ ते २०२४ या पाच वर्षांच्या काळात नव्याने ३२ लाख मतदारांची नोंदणी झाली होती. पण लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या सहा महिन्यांमध्ये ४८ लाख मतदारांची नोंदणी झाल्याचा मुद्दा काँग्रेसने हाती घेतला आहे. अवघ्या सहा महिन्यांत ४८ लाख मतदारांची संख्या कशी वाढली, असा सवाल काँग्रेसने केला आहे. महाराष्ट्रातील या घोळाची माहिती घेण्याबरोबरच भविष्यातील निवडणूक प्रक्रियेवरही या कृती गटाचे लक्ष राहील.

## महापालिकेतील ११४ कनिष्ठ अभियंत्यांची पदोन्नती होणार

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

गेल्या दीड वर्षापासून महानगरपालिकेतील कनिष्ठ आणि दुय्यम अभियंत्यांची तांत्रिक कारणामुळे पदोन्नती रखडली होती. मात्र, आता अभियंत्यांच्या पदोन्नतीचा मार्ग मोकळा झाल्याने महापालिकेत कार्यरत असलेल्या स्थापत्य विभागातील ६३ कनिष्ठ आणि यांत्रिकी विभागातील ४५ कनिष्ठ अभियंते अशा एकूण ११४ अभियंत्यांची दुय्यम अभियंता पदावर पदोन्नती होणार आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये ११८ दुय्यम अभियंत्यांची सहाय्यक अभियंता पदावर पदोन्नती झाल्यानंतर रिक्त झालेल्या दुय्यम अभियंता पदावर आता कनिष्ठ अभियंत्यांची पदोन्नती होणार आहे. फेब्रुवारी महिन्यांच्या



अखेरीस पदोन्नतीची प्रक्रिया पूर्ण होणार असल्याची माहिती नगर अभियंता विभागाकडून देण्यात आली असून कनिष्ठ अभियंत्यांना दिलासा मिळाला आहे. पालिकेच्या विभाग कार्यालयासह इतर ठिकाणी कार्यरत असलेले ६९ कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) आणि ४५ कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी) असे पदविका ते पदवीधारकांचा पदोन्नतीमध्ये समावेश आहे. संबंधित अभियंत्यांच्या सेवा ज्येष्ठतेनुसार पदोन्नती होणार असल्याची माहिती नगर अभियंता विभागाने दिली. महापालिकेत कार्यरत असलेल्या कनिष्ठ अभियंत्यांच्या पदोन्नतीचा दरवर्षी आढावा घेऊन ऑगस्ट – सप्टेंबरमध्ये पदोन्नती देण्याचा नियम आहे. मात्र, गेल्या दीड वर्षांपासून कनिष्ठ अभियंत्यांची दुय्यम अभियंता पदावर पदोन्नती झालेली नाही. परिणामी, अभियंत्यांमध्ये प्रचंड नाराजी पसरली होती. या पदोन्नतीच्या दिरंगाईला नगर अभियंता कार्यालय जबाबदार असल्याचा आरोप सातत्याने अभियंत्यांकडून केला जात होता. मात्र, आता अभियंत्यांच्या पदोन्नतीच्या मार्ग मोकळा झाला आहे.


**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, गणपत जाधव मार्ग,**
**वरळी, मुंबई - ४०० ०१८.**

| | |
|---|---|
| Email :- centralmumbai.ee@mahapwd.gov.in | ☎ ४९३६४०४/२४९३१९०२ फॅक्स २४९३१९०२ |
| जा.क्र.का.अ./ममुंवि/ई-निविदा/ | दिनांक :- |

**ई निविदा सूचना क्रमांक १८ सन २०२४-२५ (शुध्दीपत्रक क्र.१)**

कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां.) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक २४९३१९०२/२४९३६४०४ सदर कामासाठी असलेल्या निविदा अटी व शर्ती प्रमाणे पात्रता प्राप्त अनुभवी कंत्राटदाराकडून **"इपीसी (अभियांत्रिकी, खरेदी व बांधकाम)** ( Engineering, Procurement and Construction)" नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यांत यावी.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | मुंबई मंत्रालय परिसरात गार्डन गेट जवळ नवीन प्रशासकीय इमारतीचे (तळमजला + ७ मजले) बांधकाम करणे. | ९८.२८ |

| पूर्वी प्रसिध्द झालेले वेळापत्रक | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दिनांक २३/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता ते दिनांक २९/०१/२०२५ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा पूर्व बैठक- | दिनांक २७/०१/२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजता (मुख्य अभियंता, मुंबई (स.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई ४ था मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांच्या दालनात) |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दिनांक ३०/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता (अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां) मंडळ विभाग, यांचे कार्यालय, ५ वा मजला,बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई) |

करण्यात आलेले बदल

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम (कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | मुंबई मंत्रालय परिसरात गार्डन गेट जवळ नवीन प्रशासकीय इमारतीचे (तळमजला + ७ मजले) बांधकाम करणे. | ७८.०९ |

| | |
|---|---|
| ई-निविदा उपलब्ध कालावधी- | दिनांक २९/०१/२०२५ रोजी १५.०० वाजता ते दिनांक ०४/०२/२०२५ रोजी १५.०० पर्यंत |
| ई-निविदा पूर्व बैठक- | दिनांक ३१/०१/२०२५ रोजी दुपारी १५.०० वाजता (मुख्य अभियंता, मुंबई (सा.बां.) प्रादेशिक विभाग, मुंबई ४ था मजला, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई यांच्या दालनात) |
| ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) - | दिनांक ०५/०२/२०२५ रोजी १५.०० वाजता (अधीक्षक अभियंता, मुंबई (सा.बां) मंडळ विभाग, यांचे कार्यालय, ५ वा मजला,बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई) |

खालील संकेतस्थळ वरुन ई-निविदाची सर्व माहीती उपलब्ध आहे.


१. http://mahapwd.gov.in 2. http://mahatenders.gov.in
(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवरती कळविण्यात येईल.)

३. कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई (सा.बां) विभाग, वरळी, मुंबई कार्यालयातील सूचना फलक.

डीजीआयपीआर/२०२४-२०२५/५९६४

कार्यकारी अभियंता,
मध्य मुंबई (सा.बां.) विभाग,
वरळी, मुंबई.

# वसई, नालासोपारा रेल्वे स्थानकांतील गर्दी प्रवाशांच्या जीवावर



## ट्रेन मधून पडून ५० तर रुळ ओलांडताना १२८ प्रवाशांचा मृत्यू

■ **वसई : सुचिता देशमुख**

पश्चिम रेल्वेवरील वसई, नालासोपारा, मिरा रोड ही रेल्वे सर्वात गर्दीची स्थानके बनत चालली असून येथे अपघाती मृत्यूचे प्रमाणही वाढले आहे. २०२४ या वर्षात वसई रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत तब्बल २२७ प्रवाशांचा अपघाती मृत्यू झाला आहे. त्यापैकी रुळ ओलांडताना १२८ जणांचा तर गर्दीमुळे ट्रेन मधून ५० जणांचा मृत्यू झाला आहे. पश्चिमे रेल्वेची वसई रेल्वे पोलीस ठाण्याच्या अखत्यारित मिरा रोड, भाईंदर, नायगाव, वसई, नालासोपारा, विरार आणि वैतरणा अशा रेल्वे स्थानकांचा समावेश होतो. वसई विरार मध्ये लोकसंख्या वाढत असल्याने प्रवाशांची संख्या दिवसेंदिवस वाढू लागली आहे. दररोज लाखो प्रवासी पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय लोकल ट्रेन मधून मुंबईच्या दिशेने प्रवास करत असतात. त्यामुळे मिरा रोड, भाईंदर, नालासोपारा, विरार ही स्थानके प्रचंड गर्दीची ठरू लागली आहेत. विरार बोरीवली दरम्यान चार मार्गिका तयार करण्यात आली असून लोकल ट्रेन गाड्यांची संख्या देखील वाढविण्यात आली आहे. मात्र सकाळी आणि संध्याकाळी प्रचंड गर्दी असल्याने प्रवाशांना जीव धोक्यात घालून ट्रेनमधून लटकून प्रवास करावा लागत आहे. परिणामी ट्रेन मधून खाली पडून प्रवाशांना जीव गमवावा लागत आहे. २०२४ या वर्षात वसई रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५० प्रवाशांचा तर पालघरच्या हद्दीत २३ जणांचा ट्रेनमधून खाली पडून मृत्यू झाला होता. पालघर आणि वसईत एकूण ८३ प्रवाशांचा धावत्या ट्रेनमधून खाली पडून मृत्यू झाला होता. त्यात १० महिला आणि ६३ पुरूष प्रवाशांचा समावेश आहे, अशी माहिती पश्चिम रेल्वेने दिली.

वसई आणि पालघर रेल्वे पोलीस ठाण्याच्या हद्दीत रेल्वे रुळ ओलांडना मृत्यू वाढत आहे. २०२४ या वर्षात २०४ प्रवाशांचा रेल्वे रूळ ओलांडताना मृत्यू झाला. त्यात वसईच्या हद्दीत १२८ तर पालघरच्या हद्दीत ७६ जणांचा मृत्यू झाला.मागील आठवड्यात पालघर रेल्वे स्थानकात वैष्णवी रावल (१६) या विद्यार्थिनीचा रेल्वे रुळ ओलांडताना मृत्यू झाला होता.

## ठाणे ते कल्याण रेल्वे मार्गाजवळ ६०० मीटर परिसरात वाळू उत्खननाला बंदी

■ **कल्याण : आकाश कांबळे**

ठाणे ते कल्याण रेल्वे स्थानकांच्या दरम्यान खाडी किनारी भागात असलेल्या रेल्वे रुळांपासून ६०० मीटर परिसरात (दोन हजार फूट) २४ तास १४ मार्चपर्यंत अवैध वाळू उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्याचा आदेश ठाणे पोलीस आयुक्तालयातील विशेष पोलीस शाखेचे उपायुक्त मीना मकवाणा यांनी काढला आहे. या आदेशामुळे १४ मार्चपर्यंत कोणालाही ठाणे ते कल्याण रेल्वे स्थानकांच्या दरम्यानच्या रेल्वे मार्गावरील रेल्वे रुळांजवळ दोन हजार फूट परिसरात अवैध वाळी उत्खनन करता येणार नाही. या मनाई आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुध्द भारतीय न्याय संहितेच्या २००३ कलम २२३ (१) (अ, ब) कलमान्वये कारवाई केली जाणार आहे. मागील २०



वर्षाच्या कालावधीत वाळू तस्करांनी ठाणे ते डोंबिवली रेल्वे स्थानकांच्या दरम्यानच्या रेल्वे मार्गावरील मुंब्रा, कोपर रेल्वे रुळांजवळील खारफुटी तोडून तेथे वाळू उत्खनन केले आहे. कोपर येथे रेल्वे मार्गाच्या भक्कम आधार धसाला धक्का पोहचेल अशा पध्दतीने वाळू माफियांनी खोदून ठेवले आहे. याठिकाणी रेल्वे प्रशासनाला रेल्वे रुळाच्या संरक्षणासाठी सिमेंट काँक्रीटची आधार भिंत बांधावी लागली आहे. मुंब्रा ते कोपर खाडी किनारा भागातील खारफुटीची हजारो झाडे वाळू तस्करांनी वाळू उत्खननासाठी नष्ट केली आहेत. या भागातील जैवविविधता संपुष्टात आली आहे, असे पर्यावरणप्रेमींनी सांगितले. वाळू माफिया गुन्हेगार पार्श्वभूमीचे असल्याने पर्यावरणप्रेमी नागरिक थेट त्यांना उघडपणे आव्हान देऊ शकत नाही. महसूल विभागाने या वाळू माफियांविरुध्द कारवाया करून त्यांच्या वाळू उपशाच्या बोटी नष्ट केल्या आहेत. तरीही दिवस, रात्र ते चोरून लपून वाळू उपसा करत आहेत. आता वाळू उपशासाठी ते रेल्वे रूळ भागाला पसंती देत आहेत. नागरिकांच्या जीविताला धोका या वाळू माफियांनी निर्माण केला आहे. कांदळवनाचा हरितपट्टा वाळू माफियांनी नष्ट केला आहे.

## ठाणे जिल्हा निधीसाठी तहानलेलाच

■ **ठाणे : तृप्ती गोरे**

पहिल्यांदाच मुख्यमंत्री आणि त्यानंतर उपमुख्यमंत्री पद लाभलेल्या ठाणे जिल्हयातील विकास कामांसाठी गेल्यावर्षी ११६७ कोटींपैकी ४६० कोटी रुपये इतकाच निधी प्राप्त झाल्याची बाब समोर आली आहे. यंदाच्या वर्षी जिल्हयातील विकास कामांसाठी विविध विभागांकडून २८२० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली असतानाही, केवळ १०५० कोटींचा निधीची मर्यादा ठेवण्यात आली आहे. गेल्यावर्षी निधी कमी प्राप्त झाला आणि त्यातही यंदाच्यावर्षी निधीला कात्री लावण्यात आल्यामुळे ठाणे जिल्हा निधीसाठी तहानलेलाच असल्याचे चित्र आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि ठाण्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ठाणे जिल्हा नियोजन समितीची बैठक बुधवारी पार पडली. या बैठकीत जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी गेल्यावर्षीच्या जिल्हा वार्षिक योजनेच्या खर्चाचा आढावा मांडत यंदाचा प्रारुप आराखडा सादर केला. यानुसार, गेल्यावर्षी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) ९३८ कोटींच्या निधीची तरतुद



करण्यात आली होती. यापैकी शासनाकडून ३७५ कोटी २० लाखांचा निधी प्राप्त झाला आहे. त्यातील ३१० कोटी ६५ लाख रुपये इतका निधी वितरित झाला तर, २५८ कोटी २९ लाखांचा निधी केवळ खर्च झाला आहे. त्याचे प्रमाण ६९ टक्के इतके आहे. जिल्हा वर्षिक आदिवासी उपयोजनाअंतर्गत ८९ कोटी ३७ लाखांच्या निधीची तरतुद करण्यात आली होती. यापैकी ३९ कोटी १९ लाखांचा निधी प्राप्त होऊन केवळ २६ कोटी ७२ लाखांचा निधी वितरित झाला. यापैकी २६ कोटी २० लाख रुपयांचा निधी खर्च झाला असून त्याचे प्रमाण ६७ टक्के आहे. जिल्हा वार्षिक अनुसुचित जाती उपयोजनाअंतर्गत १४० कोटींच्या निधीची तरतुद करण्यात आली होती. यापैकी ४६ कोटी २० लाखांचा निधी प्राप्त होऊन केवळ ४१ कोटी ७१ लाखांचा निधी वितरित झाला. यापैकी ४१ कोटी ७० लाख रुपयांचा निधी खर्च झाला आहे. यंदाच्यावर्षी जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करिता विविध विभागांनी २४६१ कोटींची मागणी केली आहे. परंतु शासनाकडून ८०५ कोटी ८४ लाखांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे. जिल्हा वर्षिक आदिवासी उपयोजनाअंतर्गत २१९ कोटी २६ लाखांची मागणी विविध विभागांनी केली असली तरी, १०४ कोटी २६ लाखांचा निधी जिल्हयाला उपलब्ध होणार आहे. जिल्हा वार्षिक अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत १४० कोटीच्या निधीची मागणी करण्यात आली असून मागणी इतकाच निधी उपलब्ध होणार आहे. एकूणच तिन्ही योजनांसाठी विविध विभागांकडून २८२० कोटी रुपयांची मागणी करण्यात आली असतानाही, केवळ १०५० कोटींचा निधीची मर्यादा ठेवण्यात आली आहे.

## डोंबिवलीतील दत्तनगरमधील मासळी बाजारामुळे वाहतूक कोंडी; मासळी बाजाराच्या स्थलांतराची नागरिकांची मागणी

■ **डोंबिवली : सतिश सोनावणे**

येथील पूर्वेतील दत्तनगरमध्ये अनेक वर्षापासून मुख्य वर्दळीच्या रस्त्यावर दररोज मासळी बाजार भरतो. या रस्त्यावरील वाहनांची वर्दळ वाढल्याने सकाळी आणि संध्याकाळच्या वेळेत दत्तनगर मासळी भागात दररोज वाहतूक कोंडी होते. या कोंडीमुळे पादचारी, प्रवासी हैराण आहेत.

मासळी बाजारात मासळी विक्रेत्यांचे मंच पदपथाला खेटून मुख्य रस्त्यावर चार ते पाच फूट परिसरात लावलेले असतात. चाळीस ते पन्नास मासळी विक्रेते दत्तनगर भागात रस्त्याच्या दुतर्फा बसलेले असतात. डोंबिवली पश्चिमेत जाणारी बहुतांशी वाहने याच रस्त्याने धावतात. त्यांना दत्तनगर भागात मासळी बाजाराचा फटका बसतो. टंडन रस्ता, दत्तनगर रस्ता ३० फुटाचा आहे. या रस्त्याचा बहुतांशी भाग मासळी विक्रेत्यांनी व्यापलेला असतो. या मासळी बाजारामुळे



होणाऱ्या वाहतूक कोंडीचा विचार करून सहा वर्षापूर्वी दत्तनगर मधील मासळी बाजार बाजुला असलेल्या मोकळ्या भूखंडावर स्थलांतरित करण्याचा ठराव कल्याण डोंबिवली पालिकेच्या महासभेने केला आहे. त्याची नंतर अंमलबजावणी झालेली नाही. या मासळी बाजाराचा अलीकडे शालेय बस, मालवाहतूक अवजड वाहने यांना सर्वाधिक फटका बसतो. ही वाहने या भागातून जात असताना मासळी बाजाराच्या दुतर्फा बसलेल्या मंचकांचा त्यांना अडथळा येतो. आपल्यामुळे वाहनांना अडथळा होतो याचाही विचार याठिकाणी केला जात नाही. मासळी बाजारात वाहतूक कोंडी की वाहनांचा रांगा संगीतावाडी, प्रगती महाविद्यालय, कोपर पूल दिशेने लागतात.

या दररोजच्या कोंडीमुळे परिसरातील रहिवासी त्रस्त आहेत. दत्तनगर प्रभागाचे माजी नगरसेवक आमदार राजेश मोरे होते. त्यांच्या कार्यकाळात मासळी बाजार स्थलांतराचा ठराव पालिकेकडून मंजूर झाला आहे. आमदार मोरे यांनी पुढाकार घेऊन दत्तनगर मधील मासळी बाजारामुळे होणारी वाहतूक कोंडीचा विचार करून हा मासळी बाजार याच भागातील मोकळ्या जागेत स्थलांतरित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी नागरिक, प्रवाशांकडून केली जात आहे.

## ठाणेकरांपुढे पाणी संकट; टेमघर पाणी पुरवठा केंद्रातील वीज यंत्रणेत बिघाड

■ **ठाणे : संजय बोडके**

टेमघर येथील पाणी पुरवठा केंद्राला वीज पुरवठा करणाऱ्या यंत्रणेत बिघाड झाल्याने तेथे चारच पंप सुरू असून यामुळे शहराला ५० दशलक्षलीटर इतका कमी पाणी पुरवठा होत आहे. परिणामी, गुरूवारी शहरातील पाणी पुरवठा विस्कळीत झाला असून दुरुस्तीनंतरही म्हणजेच रात्री वेळेत होणारा पाणी पुरवठा कमी दाबाने केला जाणार आहे. यामुळे ठाणेकरांपुढे पाणी संकट उभे राहिल्याचे चित्र आहे. ठाणे महापालिका क्षेत्रात चार स्त्रोतांमार्फत दररोज ५८५ दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यात महापालिकेच्या योजनेतून २५०



दशलक्ष लीटर इतका पाणी पुरवठा करण्यात येतो. हा स्त्रोत शहरातील पाणी पुरवठ्यासाठी महत्वाचा मानला जातो. या पाण्याचा पुरवठा दिवा वगळता संपुर्ण महापालिका क्षेत्रात करण्यात येतो. या योजनेसाठी भातसा धरणाच्या पिसे बंधारा येथून पाणी उचलण्यात येते. पुढे टेमघर जलशुद्धीकरण केंद्रातून हे पाणी शहरातील नागरिकांपर्यंत पोहचविले जाते. दरम्यान, टेमघर जलशुद्धीकरण केंद्राला वीज पुरवठा करणाऱ्या यंत्रणेत बुधवारी रात्री बिघाड झाला. यामुळे तेथे चारच पंप सुरू आहेत. त्यामुळे यामुळे शहराला महापालिकेच्या योजनेतून २५० ऐवजी २०० दशलक्षलीटर इतकेच पाणी उपलब्ध होत आहे.

## नालासोपाऱ्यातील अनधिकृत इमारतींवर कारवाई, स्थानिकांच्या रोषाचा खासदार, आमदारांना फटका

■ **वसई : सुचिता देशमुख**

नालासोपारा येथील अग्रवाल नगरी येथे अनधिकृत इमारतींवर कारवाईचा दुसरा टप्पा सोमवारी देखील सुरू होता. मात्र नवीन इमारत न पाडता अर्धवट पाडलेली हरिकृपा इमारतच पाडण्यात आली. दरम्यान, शनिवारी घटनास्थळी रहिवाशांना



भेटायला गेलेल्या खासदार आणि आमदारांना रहिवाशांच्या रोषाचा सामना करावा लागला. दुसरीकडे, या कारवाईला स्थगिती आणण्याठी पुर्नविचार याचिका दाखल करण्यात येणार असून त्यासाठी नागरिकांच्या सह्या घेण्यात येत आहे.

नालासोपारा पूर्वेच्या अग्रवाल नगरी येथील ४१ अनधिकृत इमारतींवर कारवाई सुरू करण्यात आली आहेत. सोमवारी कारवाईला पुन्हा प्रारंभ झाला. मात्र नवीन इमारतींवर कारवाई न करता शुक्रवारी अर्धवट पाडण्यात आलेल्या साईकृपा इमारतीवर कारवाई करून ती जमीनदोस्त करण्यात आली. पहिल्या टप्प्यात पालिकेने ७ इमारती पाडल्या होता तर दुस०्या टप्प्यातील ३ दिवसात एकूण ३ इमारतीवर कारवाई करण्यात आली आहे. ४१ इमारतींपैकी १० इमारती आतापर्यंत जमीनदोस्त करण्यात आल्या आहेत. रहिवाशांना बाहेर काढणे, पडलेल्या इमारतींचा राडारोडा साफ करणे यामुळे कारवाईला विलंब होत आहे. पुढील इमारतींवर देखील कारवाई केली जाईल असे पालिकेचे उपायुक्त दिपक सावंत यांनी सांगितले. दुसऱ्या टप्प्यात कारवाईसाठी ४ दिवस देण्यात आले होते. मात्र इमारतींची संख्या जास्त असल्याने वेळ वाढवून मागितला जाईल, असेही सावंत यांनी सांगितले.

दोन दिवस कारवाई झाल्यानंतर रहिवाशांचे संसार रस्त्यावर आले होते. शनिवारी पालघर जिल्ह्याचे खासदार डॉ हेमंत सवरा, नालासोपाऱ्याचे आमदार राजन नाईक हे रहिवाशांना भेटण्यासाठी गेले.

## विमानतळबाधित तरुणांना प्रशिक्षण, सिडको मंडळ आणि अदानी कंपनीच्या समन्वयातून कौशल्यवर्ग

■ **नवी मुंबई : धनश्री सट्टा**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येत्या तीन महिन्यांनी पूर्णपणे कार्यान्वित होणार आहे. विमानतळ ज्या प्रकल्पग्रस्तांच्या जागेवर उभारले त्यांना विमानतळातील नोकरीत प्राधान्य द्यावे अशी मागणी मागील अनेक महिन्यांपासून होत होती. या पार्श्वभूमीवर सिडको मंडळ आणि अदानी कंपनीकडून प्रकल्पग्रस्त तरुणांसाठी सिडकोच्या तारा सेंटरमध्ये प्रशिक्षण वर्ग सुरू करण्याचे काम अंतिम टप्पात आले आहे. या प्रशिक्षणासाठी गेल्या तीन महिन्यांपासून १२०० इच्छुकांचे विचार केला. प्रकल्पग्रस्तांच्या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत सिंघल यांनी विमानतळाशी निगडीत नोकऱ्यांसाठी लागणारे प्रशिक्षणवर्ग सरकारमार्फत सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. याच आश्वासनपूर्तीचा भाग म्हणून सिडको मंडळाच्या परिवहन आणि विमानतळ विभागांसह 'तारा प्रशिक्षण केंद्र' आणि अदानी कंपनीच्या सहकार्याने हे प्रशिक्षण वर्ग सुरू होणार आहेत. महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या अभ्यासक्रमामार्फत एअरलाईन बॅगेज हॅन्डलर, एअरपोर्ट टर्मिनल ऑपरेशन व्यवस्थापक, एअरपोर्ट



अर्ज आले. सिडको मंडळातर्फे महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या अभ्यासक्रमानुसार फेब्रुवारी महिन्यात प्रशिक्षण केंद्र सुरू होत असल्याची माहिती सिडकोच्या विश्वसनीय सूत्रांनी दिली. नवी मुंबई विमानतळ प्रकल्पामध्ये नोकरी मिळावी, या मागणीसाठी प्रकल्पग्रस्त तरुणांनी गेल्यावर्षी जलआंदोलन आणि इतर आंदोलने करुन सिडको आणि अदानी कंपनीचे लक्ष वेधले होते. तरुणांच्या याच मागणीचा सिडको मंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी गांभीर्याने कार्गो ऑपरेशन, कस्टमर केअर प्रतिनिधी, एअरलाईन्स ग्राऊंड स्टाफ अशा विविध विभागांचे प्रशिक्षण तरुणांना दिले जाणार आहे. बारावी, पदवीधर आणि उच्च शिक्षण घेतलेल्या प्रकल्पग्रस्त तरुणांसाठी ही संधी आहे. सुरुवातीला पाच पदांसाठी तारा केंद्रातून हे प्रशिक्षण दिले जाईल. सिडको मंडळ प्रकल्पग्रस्तांचे जीवनमान उंचावणे आणि त्यांना काळानुरुप कौशल्यप्रधान बनविण्यासाठी हा उपक्रम नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त तरुणांसाठी राबविणार आहे.

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे गोरेगाव,(पूर्व),मुंबई -४०००६५.**
**ई-निविदा सूचना क्रमांक २७ सन २०२४ -२०२५**

कार्यकारी अभियता, सा.बा. विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई - ४०० ०६५ सार्वजनिक बांधकाम खात्याकडील नोंदणीकृत **कंत्राटदार वर्ग-५ व वरील वर्गाचे योग्य कंत्राटदारांकडून** खालील ब -१ नमुन्यातील निविदा ई निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कोणतेही कारण न देता सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम |
|---|---|---|
| 1. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील व्याघ्र विहाराच्या अंतर्गत रस्त्यावरील रुशीवन लगत असलेल्या रस्त्याची सुधारणा, रुंदीकरण आणि मजबुतीकरण करणेबाबत. | रु.७६९६१७२.०० |
| 2. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील व्याघ्र विहाराच्या अंतर्गत रस्त्यावरील टावरे पोइंट आणि तीन जंक्शन येथे रस्त्याची सुधारणा, रुंदीकरण आणि मजबुतीकरण करणेबाबत. | रु.५७२३०९३.०० |
| 3. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील व्याघ्र विहाराच्या अंतर्गत रस्त्यावरील फेन्सिंग लगत असलेल्या रस्त्याची सुधारणा, रुंदीकरण आणि मजबुतीकरण करणेबाबत. | रु.८०५३२४७.०० |
| 4. | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली येथील चित्ता पिंजरा परिसरातील रस्त्याचे सुधारणा, मजबुतीकरण, नुतनीकरण करणे व इतर अनुषंगीक बाबी करणे. | रु.७२१५८००.०० |

**ई - निविदा वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा डाऊनलोड करण्यांचा कालावधी | दिनांक **०३/०२/२०२५** @१५:०० पासून दिनांक **१७/०२/२०२५** @ १७:०० पर्यंत. |
| २ | निविदा सादर करण्याचा कालावधी | दिनांक **०३/०२/२०२५** @१५:०० पासून दिनांक **१७/०२/२०२५** @ १७:०० पर्यंत. |
| ३ | निविदा उघडण्याचे ठिकाण दिनांक व वेळ (शक्य झाल्यास) | दिनांक **१८/०२/२०२५** @ १७:१५ वाजता (शक्य झाल्यास) कार्यकारी अभियंता, सा.बां.विशेष प्रकल्प विभाग आरे, गोरेगाव ,मुंबई-४०००६५ यांचे कार्यालय |

खालील संकेतस्थळावर ई निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
१. https://mahapwd.com
२. https://mahatenders.gov.in
(सदर निविदेसुचनामध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईट वरती कळविण्यांत येईल.)
३. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग, आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई-४०००६५. कार्यालयातील सूचना फलक.

जा. क्र. साबांविप्र-आरे/नि.लि./ 228
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग.
आरे, गोरेगाव, (पूर्व), मुंबई ४०००६५.
दुरध्वनी क्रं. ०२२-२९२७२४४७
दिनांक:- 30/01/2025

**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विशेष प्रकल्प विभाग,**
**आरे, गोरेगाव, पूर्व, मुंबई-४०००६५.**

**डीजीआयपीआर/ २०२४-२०२५/६०८७**

# म्हाडाच्या संक्रमण शिबिरामध्ये मूळ कागदपत्र ठेवलेल्या गाळयात उंदरांचा सुळसुळाट

■ मुंबई : विशाल कारंडे

शीव, प्रतीक्षानगर येथील म्हाडाच्या अखत्यारीतील मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाच्या संक्रमण शिबिराच्या टी ६ शिबिराच्या एका गाळ्यात ठेवण्यात आलेल्या हजारो फाईल्सना वाळवी लागली आहे. उंदरांचाही सुळसुळाट झाला असून महत्वाच्या कागदपत्रांनी उंदराचे पोट भरले आहे. त्यात हजारो संक्रमण शिबिरार्थींची मूळ कागदपत्रे नष्ट झाली आहेत. दुरुस्ती मंडळाचा बेफिकीर कारभार उघड झाला आहे. तसेच संक्रमण शिबिरार्थींना पुढे कायमस्वरुपी घरे देताना त्यांची मूळ कागदपत्रे कुठून आणणार असाही प्रश्न यानिमित्ताने उपस्थित झाला आहे. दक्षिण मुंबईतील कोसळलेल्या वा अतिधोकादायक जुन्या उपकरप्राप्त इमारतीतील हजारो मूळ भाडेकरू म्हाडाच्या विविध ठिकाणच्या संक्रमण शिबिरात राहात आहेत. संक्रमण शिबिरार्थींची सर्व कागदपत्रे दुरुस्ती मंडळ जमा करून घेते. जेणेकरुन पुढे संक्रमण शिबिरातील मूळ भाडेकरूंना पुनर्वसित इमारतीत किंवा बृहतसूचीअंतर्गत कायमस्वरूपी घरे देताना कोणताही अडथळा येऊ नये. त्यामुळे मूळ इमारत रिकामी करताना दुरुस्ती मंडळाकडे जमा केलेली कागदपत्रेच संक्रमण शिबिरातील रहिवाशांचे भवितव्य ठरवत असतात. त्या कागदपत्रांचे योग्य जतन करणे दुरुस्ती मंडळासाठी अत्यंत गरजेचे आहे. असे असाताना मंडळाने हजारो भाडेकरूंची मूळ कागदपत्रे योग्य रित्या जतन करण्याऐवजी त्याच्या फाईल्स शीव, प्रतीक्षानगर येथील टी ६ संक्रमण शिबिरातील



एका इमारतीच्या गाळयात कित्येक वर्षे रचून ठेवल्या. दोन-तीन दिवसांपूर्वी मंडळाच्या काही अधिकाऱ्यांनी तो गाळा उघडला. त्यातील कागदपत्रे गाड्यांमध्ये भरण्यास सुरुवात करणार तोच यासंबंधीची माहिती शिवसेनेचे (ठाकरे ) माजी नगर सेवक रामदास कांबळे यांना मिळाली. कांबळे आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी गाळयाच्या ठिकाणी धाव घेत कागदपत्रे चाळली असता ती मूळ कागदपत्रे असल्याचे लक्षात आले. त्या गाळयात हजारोंच्या संख्येने फाईल्स होत्या. त्यांची दुरवस्था झाली होती. अनेक कागदपत्रांना वाळवी लागली होती तर काही फाईल्स उंदरांनी कुरतडल्या होत्या. अनेक फाईल्स फाटल्या होत्या अशी माहिती कांबळे यांनी दिली. यासंबंधी तिथे उपस्थित अधिकाऱ्यांना जाब विचारला असता ती मूळ कागदपत्रे असल्याचे स्पष्ट झाले, असेही कांबळे यांनी सांगितले. त्या फाईल्सचे, कागदपत्रांचे योग्य प्रकारे जतन करण्याची मागणी कांबळे यांनी केली तर फाईल्स जतन न झाल्यास त्याविरोधात आंदोलन करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

# वर्षभरात मुंबईकरांची झाली सर्वाधिक आर्थिक फसवणूक, पुणे दुसऱ्या तर ठाणे तिसऱ्या क्रमांकावर

■ मुंबई : विशेष प्रतिनिधी

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी तर देशाची आर्थिक राजधानी मानली जाते. पण याच मुंबईत सर्वाधिक आर्थिक फसवणुकीचे प्रकार घडत असल्याची बाब समोर आली आहे. मुंबईपाठोपाठ आर्थिक फसवणूक होण्यात पुणेकरांचा क्रमांक लागतो. महाराष्ट्र सरकारच्या गृह विभागाने जाहीर केलेल्या ताज्या आकडेवारीनुसार गेल्या वर्षभरात नोंद झालेल्या आर्थिक गुन्ह्यांच्या प्रकरणांबाबतची माहिती समोर आली आहे. त्यात महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये किती आर्थिक फसवणुकीचे गुन्हे आणि त्यात फसवणूक झालेली आकडेवारी याची देण्यात आली आहे. गेल्या वर्षी महाराष्ट्रात एकूण २ लाख १९ हजार ०४७ आर्थिक फसवणुकीचे गुन्हे दाखल झाले आहेत. या प्रकरणांत फसवणूक झालेली एकूण रक्कम तब्बल ३८ हजार ८७२ कोटी १४ लाख इतकी आहे! या प्रकरणांमध्ये सर्वाधिक प्रकरणं ही मुंबईत नोंद झाली आहेत. त्यामुळे एकट्या मुंबईत ५१ हजार ८७३ आर्थिक फसवणुकीचे गुन्हे दाखल झाले आहेत. या फसवणुकीची रक्कम थेट १२ हजार ४०४ कोटी १२ लाख इतकी प्रचंड आहे.

दरम्यान, एकीकडे आर्थिक राजधानी पहिल्या क्रमांकावर असताना दुसरीकडे पुण्यात दुसऱ्या क्रमांकाचे आर्थिक फसवणुकीचे गुन्हे दाखल झाले आहेत. या गुन्ह्यांची एकूण संख्या ही २२ हजार ०५९ इतकी आहे. या फसवणुकीची रक्कम ५ हजार १२२ कोटी ६६ लाख इतकी आहे. संपूर्ण पुणे जिल्ह्याचा विचार करता दाखल प्रकरणांची संख्या ४३ हजार ८०२ इतकी असून त्यातील १२ हजार ११५ प्रकरणं पिंपरी-चिंचवडमध्ये दाखल झाली आहेत. इथे फसवणुकीची रक्कम ३ हजार २९१ कोटी २५ लाख इतकी आहे. तर पुणे ग्रामीण भागात आर्थिक फसवणुकीमुळे झालेल्या नुकसानाचा आकडा ४३४ कोटी ३५ लाख इतका आहे. दरम्यान, मुंबईपाठोपाठ ठाणे जिल्ह्यात आर्थिक गुन्ह्यांची तब्बल ३५ हजार ३८८ प्रकरणं गेल्या वर्षभरात नोंद झाली आहेत. यापैकी ठाणे शहरात २० हजार ८९२, नवी मुंबईत १२ हजार




२६० तर ठाणे ग्रामीणमध्ये १२३६ प्रकरणांची नोंद झाली आहे. संपूर्ण ठाणे जिल्ह्यात आर्थिक फसवणूक गुन्ह्यांमध्ये नुकसान झालेल्या रकमेचा आकडा ८ हजार ५८३ कोटी ६१ लाख आहे. मीरा भाईंदर आणि वसई-विरारमध्ये एकूण ११ हजार ७५४ आर्थिक फसवणुकीचे प्रकार नोंद झाले असून त्यातून १४३१ कोटी १८ लाखांची फसवणूक झाल्याचं समोर आलं आहे.

नागपूर शहरात आर्थिक फसवणुकीचे ११ हजार ८७५ गुन्हे नोंद झाले आहेत. नागपूर ग्रामीणमध्ये हीच संख्या १६२० इतकी आहे. नागपूर जिल्ह्यात आर्थिक फसवणुकीतून नुकसान झालेली रक्कम १४९१ कोटी ७ लाख इतकी आहे. अशा गुन्ह्यांची नाशिकमधील संख्या ९१६९ इतकी असून त्यातील ६३८१ गुन्हे नाशिक शहरात तर २७८८ गुन्हे नाशिक ग्रामीणमध्ये दाखल झाले आहेत. यातील रक्कम १०४७ कोटी ३२ लाख आहे. छत्रपती संभाजी नगरमध्ये ६०९० गुन्ह्यांमध्ये ५४३ कोटी ६१ लाखांची फसवणूक तर अमरावती जिल्ह्यात २७७८ गुन्ह्यांमध्ये २२३ कोटी ५९ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचं निष्पन्न झालं आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात ४८३७ गुन्हे तर अमरावती शहरात १८१९ गुन्हे दाखल झाले आहेत. सोलापूर जिल्ह्यात ३४५७ गुन्ह्यांमध्ये ३९४ कोटी ५४ लाखांची फसवणूक झाली आहे.

# 'भारतीयांचं स्वप्न पूर्ण करणारा अर्थसंकल्प', पंतप्रधान नरेंद्र मोदीकडून अर्थसंकल्पाचं कौतुक

■ नवी दिल्ली : प्रगती शर्मा

अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी अर्थसंकल्प सादर केला आहे. या अर्थसंकल्पात विविध क्षेत्रांसाठी महत्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत. आता १२ लाखांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्यात आलं आहे. या बरोबरच लघू उद्योग, शेती, उत्पादन, रोजगारासह ३६ औषधांवरील करात सूट देण्याची घोषणा करण्यात आली आहे. आता ३६ औषधांवरील शुल्क कर पूर्णपणे रद्द करण्यात येणार आहे, तसेच सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये कॅन्सर डे केअर सेंटर सुरू करण्यात येणार असल्याची मोठी घोषणा देखील अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी केली. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केलं आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सादर केलेला अर्थसंकल्प हा प्रत्येक भारतीयांची स्वप्ने पूर्ण करणारा अर्थसंकल्प असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. भारताच्या विकासाच्या प्रवासातील आजचा दिवस महत्त्वाचा टप्पा आहे. भारताच्या विकासासाठी आजचा अर्थसंकल्प गुंतवणूक आणि बचत वाढवणारा आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदींनी म्हटलं आहे. 'अर्थसंकल्पात सरकारची तिजोरी कशी भरली जाईल यावरच लक्ष केंद्रित केलं जातं. मात्र, हा अर्थसंकल्प त्याच्या पूर्णपणे विरुद्ध आहे. देशातील नागरिकांचे खिसे कसे भरले जातील, देशातील नागरिकांची बचत कशी वाढेल आणि देशातील नागरिक विकासाचे भागीदार कसे



होतील, याचं उदाहरण म्हणजे हा आजचा अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पात अत्यंत महत्त्वाची आणि ठोस पावले उचलण्यात आली आहेत. या अर्थसंकल्पात एक नाही तर अनेक महत्वाच्या घोषणा करण्यात आल्या आहेत', असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं. 'आज संसदेत सादर झालेला अर्थसंकल्प हा १४० कोटी भारतीयांची स्वप्ने पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. विकसित भारताचे ध्येय सामान्य नागरिकच पुढे नेण्याचं काम करतील. या अर्थसंकल्पामुळे सर्वसामान्यांची बचत नक्कीच वाढणार आहे. या अर्थसंकल्पामुळे देशातील विकास झपाट्याने वाढेल. ज्यामुळे विकसित भारताच्या ध्येयाला अधिक चालना मिळेल. आत्मनिर्भर भारत मोहिमेला चालना मिळण्यासाठी नक्कीच फायदा होईल', असंही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.'जनतेची स्वप्ने पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. तरुणांची स्वप्ने पूर्ण करणारा हा अर्थसंकल्प आहे. हा अर्थसंकल्प देशाची शक्ती वाढवणारा आहे. या अर्थसंकल्पामुळे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक वाढेल. तसेच अर्थसंकल्पात शेतकऱ्यांसाठी करण्यात आलेल्या घोषणा कृषी क्षेत्रात आणि संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेत नव्या क्रांतीचा आधार ठरतील. या अर्थसंकल्पातून शेतकऱ्यांना आणखी मदत मिळेल', असंही पंतप्रधान नरेंद्र मोर्दीनी म्हटलं आहे.

# परदेशी कंपनीला बनावट ई-मेल पाठवून दीड कोटींची सायबर फसवणूक

■ मुंबई : राकेश गायकवाड

परदेशी कंपनीशी साधर्म्य असलेला ई-मेल आयडी तयार करून अंधेरीतील कंपनीची सुमारे दीड कोटी रुपयांची सायबर फसणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. आरोपीने अंधेरीतील तक्रारदार कंपनीच्या अधिकाऱ्यांचेही ई-मेल हॅक केले होते. याप्रकरणी अज्ञात आरोपींविरोधात तोतयागिरी करणे व माहिती तंत्रज्ञान गैरवापर प्रतिबंधक



कायद्याअंतर्गत अंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. रक्कम जमा झालेल्या बॅंक खात्यांच्या माहितीद्वारे पोलीस तपास करीत आहेत. सायबर पोलिसही याप्रकरणी समांतर तपास करीत आहेत. अंधेरी पश्चिम येथील कंपनीने याप्रकरणी अंबोली पोलिसांकडे नुकतीच तक्रार केली होती. त्यानुसार पोलिसांनी शुक्रवारी भारतीय न्याय संहिता कलम ३१९, ३१८ (२), ३३६ (२), ३३६ (३), ३३८, ३४० (२) व माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ४३, ६६, ६६ (क) व ६६ (ड) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार कंपनी रसायन क्षेत्रातील आहे. आरोपींनी ६ डिसेंबर २०२४ रोजी तक्रारदार कंपनीतील वरिष्ठ निर्यात व्यवस्थापक मंगला कामत व व्यवसाय विकास व्यवस्थापक अंगद सिंह यांचा अधिकृत ई-मेल हॅक केला. त्यानंतर या कंपनीची ग्राहक कंपनी असलेल्या इजिप्त कॅनेडियन कंपनीच्या नावाशी साधर्म्य असलेला ई-मेल तयार केला. हॅक केलेल्या ई-मेद्वारे आरोपी परदेशी कंपनीबरोबर संपर्क साधायचा. बनावट ई-मेलद्वारे अंधेरीतील कंपनीशीही तो संपर्क साधत होता.

# कुष्ठरोग शोध अभियानाअंतर्गत ४९ लाख नागरिकांची महानगरपालिका करणार तपासणी

■ मुंबई : नितीन देवळेकर

'राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमा'च्या मार्गदर्शक तत्वांनुसार २०३० पर्यत कुष्ठरोग निर्मूलनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. लवकरात लवकर शोध घेऊन कुष्ठ रोग रुग्णांना औषधोपचाराखाली आणण्यासाठी मुंबई महानगरपालिकेमार्फत विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे ३१ जानेवारी ते १५ फेब्रवारी २०२५ दरम्यान कुष्ठरोग शोध



अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानादरम्यान मुंबईतील ९ लाख ८९ हजार घरांतील अंदाजित ४९ लाख नागरिकांची तपासणी करण्यात येणार आहे. मुंबई महानगरपालिका क्षेत्रामध्ये कुष्ठ रोग शोध तपासणी मोहिमेअंतर्गत शेवटच्या घटकापर्यंत पोहचून नागरिकांची तपासणी करण्याचे निर्देश मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी यांनी दिले आहेत. तसेच नव्याने आढळणाऱ्या कुष्ठरोग रुग्णांसाठी नजीकच्या परिसरातच उपचाराची सुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांनी दिल्या आहेत. कुष्ठ रोग शोध अभियान २०२४-२५ अंतर्गत आरोग्य कर्मचारी घरोघरी जाऊन कुष्ठरोगविषयक जनजागृती, तपासणी करणार आहे. कुष्ठरोगाच्या नवीन रुग्णांचा शोध घेणार आहेत. या अभियानाकरिता एकूण २ हजार ८०७ चमू तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक चमूमध्ये एक महिला आरोग्य स्वयंसेविका व स्वयंसेवक यांचा समावेश असेल. या चमूंमार्फत ९ लाख ८९ हजार घरांतील अंदाजित ४९ लाख नागरिकांची तपासणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या अभियानादरम्यान आढळलेल्या नवीन कुष्ठरुग्णांची नोंदणी करण्यात येईल. त्यांना नजिकच्या महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रे, दवाखाने येथे मोफत उपचाराकरिता संदर्भित केले जाईल. कुष्ठरोगाचे असांसर्गिक कुष्ठरोग व सांसर्गिक कुष्ठरोग असे दोन प्रकार असून बहुविध औषधोपचार पद्धतीने कुष्ठरोग बरा होतो. कुष्ठरोगाच्या प्रकाराप्रमाणे एमडीटीचे औषध असांसर्गिक रुग्णास ६ महिने व सांसर्गिक रुग्णास १ वर्ष एवढ्या कालावधीसाठी देण्यात येते. बहुविध औषध (एमडीटी) उपचाराची पाकिटे महानगरपालिकेचे सर्व आरोग्य केंद्र, दवाखाने तसेच ऑक्वर्थ महानगरपालिका कुष्ठरोग रुग्णालय येथे मोफत उपलब्ध आहेत.

# नाल्यांच्या सफाईसाठी ५४० कोटींचा खर्च अपेक्षित

■ मुंबई : मेहुल गायकवाड

पावसाळापूर्व कामांचा भाग म्हणून यंदाही नालेसफाई करण्यात येणार असून त्याकरीता पालिका प्रशासनाने शुक्रवारी निविदा मागवल्या. मोठे नाले, लहान नाले, भूमिगत गटारे, मिठी नदी यांच्यामधील गाळ काढण्यासाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत. या सगळ्या कामांसाठी एकूण २६ विविध निविदा परिमंडळाप्रमाणे मागवण्यात आल्या आहेत. प्रथमच दोन वर्षांसाठी कंत्राटदार नेमण्याकरीता निविदा मागवण्यात आल्या आहेत. या कामांचा खर्च ५४० कोटी होणार आहे. मुंबईत पावसाळ्यात पाणी तुंबू नये म्हणून दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नदी व नाल्यांमधील गाळ काढण्याची कामे केली जातात. संपूर्ण वर्षभरातील नालेसफाईपैकी ७५ टक्के गाळ हा पावसाळ्याआधी काढला जातो. तर १५ टक्के गाळ पावसाळ्यादरम्यान आणि १० टक्के पावसाळ्यानंतर काढला जातो. ही कामे दरवर्षी मार्च महिन्यात सुरू होतात. त्याकरीता डिसेंबर महिन्यात निविदा मागवल्या जातात. यंदा मात्र या निविदांना उशीर झाला असून पुढील दोन महिन्यात निविदा प्रक्रिया पूर्ण करून एप्रिल पासून



नालेसफाईच्या कामांना सुरूवात करावी लागणार आहे. त्यामुळे यंदा ही कामे एप्रिल महिन्यात होणार का याबाबत शंका आहे. नालेसफाईसाठी दरवर्षी एका वर्षाकरीता निविदा मागवल्या जातात. यंदा मात्र प्रथमच दोन वर्षांसाठी निविदा मागवल्या जात आहेत. गेल्यावर्षी नालेसफाईसाठी पालिका प्रशासनाने २५० कोटी खर्च केले होते.

# आगामी BMC निवडणुकीसाठी भाजपनं कंबर कसली, उत्तम मुंबई घडवण्यासाठी आखला मोठा प्लान

■ मुंबई : प्रथमेश चव्हाण

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका लवकरच पार पडणार आहेत. यासाठी नेते मंडळीनीही कंबर कसली आहे. राज्यातील नेत्यांमध्ये फोडाफोडीचं राजकारण सुरू झालं आहे. अनेक नेत्यांनी मोर्चेबांधणीलाही सुरूवात केली आहे. काही दिवसांपूर्वी भाजपचं शिर्डीत अधिवेशन पार पडलं होतं. आता मुंबईतही भाजपच्या नेत्यांनी कामाला सुरूवात केली आहे. अशातच भाजपचे खासदार पीयूष गोयल यांनी



उत्तर मुंबईत नवा प्लान आखला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पीयूष गोयल यांनी अनेक आश्वासने दिली आहेत. उत्तर मुंबई ही उत्तम मुंबई घडवण्याचा संकल्प त्यांनी हाती घेतलं असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. 'उत्तर मुंबई ही उत्तम मुंबई घडवण्याचा संकल्प आम्ही हाती घेतला आहे. लोककल्याण कार्यालयातून हा संकल्प आम्ही आणखी पुढे घेऊन जाणार आहोत. एकही व्यक्ती नोकरी आणि रोजगाराविना राहणार नाही. सर्वांना आहे त्याच ठिकाणी घर देताना वीज, पाणी तसेच स्वयंपाकाच्या गॅससह सर्व सुविधा पुरवू', असे आश्वासन खासदार पीयूष गोयल यांनी यावेळी दिले. ज्येष्ठ भाजपा नेते वेदप्रकाश गोयल यांच्या जन्मशताब्दीनिमित्त उत्तर मुंबईचे खासदार पीयूष गोयल यांच्या कांदिवली येथे लोककल्याण या जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा शुक्रवारी पार पडला. यावेळी पालकमंत्री ॲड. आशीष शेलार, सहपालक मंत्री मंगल प्रभात लोढा, ज्येष्ठ भाजप नेते राम नाईक, माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार योगेश सागर, प्रविण दरेकर, अतुल भातखळकर, मनीषा चौधरी, विजयभाई गिरकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. जनता आणि कार्यकर्त्यांसाठी सुरू होत असलेले लोककल्याण कार्यालय हा जनता आणि भाजपामधील सेतू आहे आणि येथून जनतेची समस्यांमधून सुटका होईल, असा विश्वास उत्तर मुंबईचे खासदार पीयूष गोयल यांनी व्यक्त केला आहे.

# पिंपरीत १३ ठिकाणचे पाणी दूषित जलशुद्धीकरण केंद्रात कशी होते पाण्यावर प्रक्रिया?

■ पिंपरी-चिंचवड : शकिल शेख

गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) या आजाराचे रूग्ण वाढत असल्याने महापालिकेने शहरातील २३ ठिकाणचे पाण्याचे नमुने तपासणीसाठी पुण्यातील राज्य आरोग्य प्रयोगशाळेत पाठविले होते. त्यापैकी थेरगाव, पिंपरी, काळेवाडी, अजमेरा, दिघी, ताथवडे, मोशी, भूमकर वस्ती आदी १३ परिसरातील पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल आला आहे. दूषित पाण्याद्वारे 'जीबीएस'ची लागण होण्याची शक्यता असल्याने महापालिकेने या भागातील पाण्याची पुन्हा तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. पिंपरी-चिंचवड शहरात जीबीएस आजाराचे १७ संशयित रूग्ण आहेत. त्यापैकी एकाचा मृत्यू झाला आहे. वाढत्या रूग्ण संख्येच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने शहरातील पाणी तपासणीची मोहिम हाती घेतली आहे. या आजाराची प्राथमिक लक्षणे आढळलेली संशयित रूग्ण



ज्या भागात वास्तव्य करतात, त्या परिसरात महापालिकेद्वारे नळामार्फत पुरविल्या जाणा-या पाण्याचे नमुने तपासण्यात येत आहेत. त्यानुसार शहरातील २३ ठिकाणचे पाण्याचे नमुने तपासणीसाठी पुण्यातील राज्य आरोग्य प्रयोगशाळेत पाठविले होते. त्यापैकी थेरगाव, पिंपरी, काळेवाडी, अजमेरा, दिघी, ताथवडे, मोशी, भूमकर वस्ती, संत तुकारामनगर परिसरातील पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा अहवाल आला आहे. महापालिकेच्या जलशुद्धीकरण केंद्रात पाणी निर्जंतुकीकरण केले जाते. विविध शास्त्रोक्त प्रक्रियांचे अवलंब करुनच शहरामध्ये पाणीपुरवठा केला जातो. पाणी निर्जंतुकीकरणासाठी आवश्यक असणारी 'टीसीएल' पावडर वापरण्यात येते. नागरिकांना शुद्ध पाणी मिळण्यासाठी जलशुद्धीकरण केंद्राकडून अत्यावश्यक प्रक्रियांचा अवलंब करण्यात येत असल्याचे पाणीपुरवठा विभागाने सांगितले.

महापालिका पवना नदीतून रावेत येथील बंधा-यावरून अशुध्द जलउपसा केंद्रातून ५४० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी उचलते. हे पाणी निगडी, प्राधिकरणातील जलशुद्धीकरण केंद्रात आणले जाते. याठिकाणी अत्याधुनिक पद्धतीने पाच टप्प्यात पाणी शुद्धीकरणाची प्रक्रिया केली जाते. क्लोरीन टाकून पाण्यातील जंतू मारले जातात. त्यानंतर पाण्यात 'लिक्विड' मिसळले जाते. फिल्टरने पाणी स्वच्छ केले जाते. त्यानंतर शुद्ध टाकीमध्ये पाणी सोडले जाते. या टाकीत पाणी सोडतानाच निर्जंतुकीकरण करण्यासाठी आवश्यकतेनुसार 'लिक्विड क्लोरिन' सोडला जातो.